शुक्रवार, १६ फेब्रुवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १७८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 16 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-178 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


## अजित पवार गटाचे आमदार पात्र

### राहुल नार्वेकर : शरद पवार गटाची मागणी फेटाळली

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादीतील फूट आणि आमदार अपात्रता प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी गुरुवारी मोठा निर्णय दिला. राष्ट्रवादी कुणाची हे ठरविताना विधिमंडळ पक्षातील बहुमत हा एकमेव निकष असल्याचे सांगत अजित पवार गटाला ५३ पैकी ४१ आमदारांचा पाठिंबा असल्याने अजित पवार गट हा मूळ राष्ट्रवादी पक्ष आहे, असा निकाल त्यांनी दिला. त्याचवेळी अजित पवार गटाचे आमदार अपात्र करण्याची शरद पवार गटाची मागणीही त्यांनी फेटाळून लावली. त्यामुळे अजित पवार गटाचे सर्व आमदार पात्र ठरले आहेत. दुसरीकडे शरद पवार गटाचे आमदारही त्यांनी पात्र ठरवलेले आहेत. त्यामुळे अगदी शिवसेनेच्या निकालाप्रमाणेच नार्वेकरांनी राष्ट्रवादी आमदार प्रकरणाचा निकाल दिला. पक्षघटना, नेतृत्वरचना आणि विधिमंडळ संख्याबळ लक्षात घेऊन निर्णय दिल्याचे नार्वेकर यांनी सांगितले.





शरद पवार यांच्या मनाविरोधात जाणे म्हणजे पक्ष सोडणे नाही. पक्षामध्ये मतभेद असतात. पक्षांतर्गत नाराजी म्हणजे विधिमंडळ पक्षात नाराजी असू शकत नाही. तसेच पक्षातील मतभेद म्हणजे कायद्याचा भंग असू शकत नाही, असे महत्त्वाचे निरीक्षण राहुल नार्वेकर यांनी नोंदवले.

**शरद पवार गटाने १० व्या परिशिष्टाचा गैरवापर करू नये : नार्वेकर**
१० व्या सूचीकडे मी कॅलिडोस्कोपद्वारे पाहिलं. युती आघाडी होतात किंवा तुटतात हे राजकारण आहे. सर्वच कृत्ये किंवा आचरण हे पक्षांतर मानले जाऊ शकत नाही. शरद पवार गटाने १० व्या परिशिष्टाचा गैरवापर करू नये अशी महत्त्वाची टिप्पणी नार्वेकर यांनी केली.
**अध्यक्ष कोण हे मी ठरवणार नाही :** २९ जून २०२३ पर्यंत शरद पवार यांच्या नेतृत्वाला आव्हान नव्हते. परंतु ३० जून रोजी त्यांच्या अध्यक्षपदाला आव्हान देऊन नव्या अध्यक्षाची निवड झाली. दोन्ही गटाच्या वतीने घटनेनुसार अध्यक्षपदाची निवड झाली नसल्याचा दावा करण्यात आला. आपला अध्यक्ष कसा योग्य आहे, हे पटवून देण्यासाठी दोन्ही गटाकडून समांतर पुरावे सादर करण्यात आले. परंतु अध्यक्ष कोण हे मी ठरवणार नाही, असेही राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

### महत्त्वाची बातमी

## पुन्हा उपोषण करण्याचे कारण काय : भुजबळ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गेल्या ५ दिवसांपासून मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या अध्यादेशाच्या अंमलबजावणीसाठी बेमुदत उपोषणाला बसले आहेत. यासंदर्भात ओबीसी आरक्षण रक्षणाच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका मांडणारे मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत आक्रमक मुद्दे मांडले आहेत. त्यांनी मनोज जरांगे यांच्यावर टीका करतानाच कुणबी नावाने मागच्या दाराने मराठ्यांना ओबीसीमध्ये घुसवण्याच्या प्रयत्नाचा आक्रमकपणे विरोध करणारच, अशी ठाम भूमिका त्यांनी स्पष्ट केली आहे. लोकांच्या घरासमोर रात्री ३ – ३ वाजेपर्यंत वेडंवाकडं बोलून त्रास दिला गेला. हे झाल्यानंतर पुन्हा उपोषण करण्याचे कारण काय? मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्या ही आमची पहिल्यापासून भूमिका आहे. मागच्या दाराने त्यांना कुणबी म्हणून घुसवू नका. सगेसोयरेच्या नावाखाली त्याची नको ती व्याप्ती वाढवू नका, असे भुजबळ म्हणाले. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना राणे समितीच्या शिफारशीनुसार एक कायदा केला. तो फेटाळला गेला. फडणवीस मुख्यमंत्री असताना गायकवाड कमिशनच्या शिफारशीनुसार आरक्षण देण्यात आले. पण सर्वोच्च न्यायालयाने ते नाकारले. त्यातल्या त्रुटी कमी करण्यासाठी आयोग नेमण्यात आला. त्यावर वाद वगैरे झाला हे वेगळं. त्या आयोगानं १५-२० दिवसांत अडीच कोटी घरांचं सर्वेक्षण करण्यात आलं असं मी ऐकलंय. क्युरेटिव्ह पिटीशनसाठी तीन न्यायमूर्तीही बसले आहेत. मराठा समाजाला वेगळं आरक्षण कसे दिले जाईल, यासाठी हे सगळे बसले आहेत. आमचा पाठिंबा त्याला आहेच, असेही भुजबळ म्हणाले.

## शिवसेनेच्या नगरसेवकावर गोळीबाराचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**नगर :** पारनेर शहरात गुरुवारी सकाळी नगरसेवक युवराज पठारे यांच्यावर गोळीबार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. गावठी कट्ट्यातील गोळी कट्ट्यातच फसल्याने पठारे बचावले. पठारे यांच्या समवेत असलेल्या एकाने गोळीबार करणाऱ्याच्या हातातील कट्टा हिसकावून घेतला. ही घटना सकाळी साडेदहाच्या सुमारास घडली. युवराज पठारे हे शिवसेनेचे नगरसेवक व पारनेर तालुका तालीम संघाचे अध्यक्ष आहेत. ते विखे समर्थक म्हणून त्यांची ओळख आहे. घटनेनंतर महसूल मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे, खासदार सुजय विखे यांनी दूरध्वनीवरून पठारे यांची चौकशी केली. गोळीबाराचा प्रयत्न करणारा अल्पवयीन असून तो पारनेर तालुक्यातीलच रहिवासी आहे.

## सोनिया गांधींचे रायबरेलीतील जनतेला भावनिक पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेस पक्षाच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी आगामी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. तर, राज्यसभा निवडणुकीसाठी त्यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी त्यांचा मतदारसंघ असलेला रायबरेतील जनतेसाठी खास पत्र लिहिले असून त्यामार्फत भावनिक साद घातली आहे.
सोनिया गांधींनी पत्रात म्हटले की, दिल्लीत माझे कुटुंब अपूर्ण आहे. मी रायबरेलीला येते आणि तुम्हा सर्वांना भेटते, तेव्हा हे माझे अूर्ण कुटूंब पूर्ण होते. हे जवळचे नाते खूप जुने आहे आणि मला ते माझ्या सासरच्या मंडळींकडून मिळाले आहे. रायबरेलीशी आमच्या कुटुंबाचे संबंध खूप खोल आहेत. स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्या लोकसभा



निवडणुकीत तुम्ही माझे सासरे फिरोज गांधी यांना येथून विजयी करून दिल्लीला पाठवले. त्यांच्यानंतर तुम्ही माझ्या सासू इंदिरा गांधी यांना आपलेसे केले. तेव्हापासून आजतागायत ही मालिका आयुष्यातील चढ-उतार आणि खडतर वाटेवरून प्रेमाने आणि उत्साहाने सुरू राहिली आहे आणि आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे, असे सोनिया गांधी म्हणाल्या. तुम्ही मलाही या उज्ज्वल वाटेवर चालायला संधी दिलीत. माझी सासू आणि माझा जीवनसाथी कायमचा गमावल्यानंतर मी तुमच्याकडे आले आणि तुम्ही मला मदतीचा हात दिलात. मागच्या दोन निवडणुकांत खडकाप्रमाणे तुम्ही माझ्या पाठीशी उभे राहिलात, हे मी कधीच विसरू शकत नाही. मला सांगायला अभिमान वाटतो की आज मी जी काही आहे ते तुमच्यामुळेच आहे आणि या विश्वासावर कायम राहण्याचा मी प्रयत्न केला आहे, असे म्हणत सोनिया गांधी यांनी कृतज्ञता व्यक्त केली.
प्रकृती आणि वाढत्या वयामुळे मी पुढील लोकसभा निवडणूक लढवणार नाही. या निर्णयानंतर मला तुमची थेट सेवा करण्याची संधी मिळणार नाही, पण माझे मन आणि आत्मा सदैव तुमच्या पाठीशी राहील हे निश्चित.
मला माहीत आहे की, तुम्ही सुद्धा माझी, माझ्या परिवाराची प्रत्येक अडचणीत काळजी घ्याल, जशी तुम्ही आजवर माझी काळजी घेत आहात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## निवडणूक रोखे योजना घटनाबाह्य : सर्वोच्च न्यायालय

### राजकीय पक्षांना निधी कोठून मिळतोय याची माहिती मिळणे गरजेचे

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे योजना रद्दबातल ठरवली आहे. निवडणूक रोखे योजना घटनाबाह्य असून त्यामुळे नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराचे हनन होते, असा निर्णय न्यायालयाने दिला आहे. पाच सदस्यीय घटनापीठाने हा निर्णय दिला असून या घटनापीठाच्या अध्यक्षस्थानी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड होते. घटनापीठातील पाचही सदस्यांनी एकमताने हा निर्णय दिला आहे. घटनापीठाच्या पहिल्या निकालाचे वाचन सरन्यायाधीशांनी केले. तर दुसऱ्या निकालाचे वाचन न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी केले. न्यायालयाने निकाल देताना खालील प्रश्नांचा विचार केल आणि त्यावर आपला निर्णय दिला. निवडणूक रोखे योजनेमुळे माहितीच्या अधिकाराचे हनन, निवडणूक रोखे योजनेमुळे माहितीचा अधिकार देणाऱ्या संविधानातील अनुच्छेद १९ (१) (अ) चे उल्लंघन होत आहे का? याचा न्यायालयाने विचार केला. यावर बोलताना 'राजकीय पक्षांना कोठून निधी मिळतोय याची माहिती मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे निवडणूक रोखे योजनेमुळे माहितीच्या अधिकाराचे हनन होते,' असे न्यायालयाने म्हटले.
निधीबद्दल खुलासा न करणे हे घटनाबाह्य अमर्यादित निधीमुळे मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांवर परिणाम होतो का? याचाही न्यायालयाने विचार केला. याबाबत निर्णय देताना राजकीय पक्षांना मिळणारा निधी आणि धोरणनिर्णिती यावर सरन्यायाधीशांनी भाष्य केले. कपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या निधीबद्दल खुलासा न करणे हे असंवैधानिक आहे, असे सरन्यायाधीश म्हणाले. निवडणूक रोख्यांमुळे काळ्या पैशाला आळा घालता येतो, असा दावा सरकारकडून करण्यात आला. मात्र या दाव्यामुळे मूलभूत अधिकारांमध्ये होत




असलेला हस्तक्षेप समर्थनीय ठरू शकत नाही, असे न्यायालय म्हणाले. हा निर्णय देताना न्यायालयाने २०१७ सालच्या पुट्टास्वामी निकालाचा आधार घेतला. या निकालात तीन मुद्दे लक्षात घेण्यात आले होते.

निवडणूक रोखे हा निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांचा भाग असल्यामुळे ही प्रक्रिया अधिक पारदर्शी होईल. राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्यांमध्ये पारदर्शकता आल्यामुळे काळ्या पैशाला आळा बसेल. निवडणूक रोख्यांद्वारे देणग्या देणारी कंपनीचा वा देणगीदाराचा 'केवायसी' बँकेकडे असल्यामुळे बेनामी निधी गोळा होण्याची शक्यता संपुष्टात येते. अनेक कंपन्यांना राजकीय पक्षांना देणगी देण्याची इच्छा असली तरी, त्यांना राजकीय प्रक्रियेचा भाग व्हायचे नसते. निवडणूक रोख्यांमुळे अशा देणगीदारांनाही कोणत्याही दबावाविना देणगी देता येऊ शकेल. निवडणूक रोख्यांची प्रक्रिया बँकेच्या माध्यमातून ऑनलाइन होणार असल्यामुळे प्राप्तिकर खाते व अन्य यंत्रणांना हा तपशील उपलब्ध असेल. त्यामुळे आर्थिक गैरव्यवहारांना जागा राहणार नाही.

**निवडणूक आयोगाला माहिती प्रसिद्ध करण्याचा आदेश :** न्यायालयाने आपल्या निर्णयात प्राप्तीकर कायदा तसेच लोकप्रतिनिधी कायद्यातील कलम २९ क यात केलेल्या सुधारणा घटनाबाह्य आहेत, असा निकाल दिला. तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाला नव्याने निवडणूक रोखे जारी करण्यावरही न्यायालयाने बंदी आणली आहे. तसेच राजकीय पक्षांना मिळालेल्या निवडणूक रोख्यांचा तपशील सादर करावा, असा आदेशही न्यायालयाने स्टेट बँक ऑफ इंडियाला दिला आहे. भारतीय निवडणूक आयोगाने ही सर्व माहिती येत्या ३१ मार्चपर्यंत आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी, असेही न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे.

**काँग्रेस– डावे पक्ष :** निवडणूक रोख्यांची संपूर्ण प्रक्रिया अपारदर्शी असून गुप्त व्यवहारांमुळे सत्ताधारी व देशी–विदेशी उद्योजकांमध्ये हितसंबंध निर्माण होतात. त्यातून भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जाते. विदेशी कंपन्या कुठल्याही कायद्याच्या चौकटीत येत नसल्यामुळे या कंपन्या सत्ताधारी पक्षाला निधी पुरवून आर्थिक धोरणांमध्ये हस्तक्षेप करू शकतात. या प्रक्रियेतून काळ्या पैशाला अडकाव नव्हे तर खतपाणी घातले जाते. रोखे म्हणजे काळे पैसे पांढरे करण्याचा मार्ग बनला आहे. देणगीदाराचे नाव उघड होत नसल्यामुळे कॉर्पोरेट कंपन्या सत्ताधारी पक्षाला अधिकाधिक निधींचा पुरवठा करू शकतात. निवडणूक रोख्यातून भाजपला सर्वाधिक निधी मिळाला असून त्याचा भाजपने राज्य सरकारे बरखास्त करण्यासाठी, आमदारांच्या फोडाफोडीसाठी गैरवापर केला आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

संत नामदेव, चोखामेळा, जनाबाई, मुक्ताबाई अशा कितीतरी संतांनी तुझं वैभव वाढवलं. आमची निरक्षर असलेली बहिणाबाई इतकं सुंदर काव्य बोलली की भल्याभल्यांनी तोंडात बोटं घातली. स्वातंत्र्यवीर सावरकरांचं योगदान तर काय सांगावं...! त्यांच्या शब्दात सांगायचं तर तू म्हणजे स्वातंत्र्यदेवतेसारखीच आहेस. गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गाली स्वतंत्रते भगवती तूच जी विलसतसे लाली तू सूर्याचे तेज उदधिचे गांभीर्यही तूचि... या ओळी तुला सुद्धा लागू होतात. ग दि माडगूळकर, मंगेश पाडगावकर, भा रा तांबे, बा भ बोरकर यासारखे कवी, लोकमान्य टिळक, लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आचार्य अत्रे, वसंत कानेटकर, पु ल देशपांडे, राम गणेश गडकरी यांच्यासारख्या अनेक लेखकांनी तुझ्या अंगावर विविध रूपांचा साज चढवला. कविवर्य कुसुमाग्रज, वि स खांडेकर, विंदा करंदीकर यांनी तर मराठी साहित्यात जी भाषेची समृद्धी, श्रीमंती आणली, त्यामुळे साहित्य अकादमीला तुझी दखल घ्यावीच लागली. कुसुमाग्रज तर मराठी मातीबद्दल बोलताना म्हणाले...
माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या, दऱ्याखोऱ्यांतील शिळा काय बोलू, किती बोलू आणि कसं सांगू असं होतंय मला. आणि माते, तरीही तुझी आज अशी अवस्था ?' बाळा, तू म्हणतोस ते सगळं बरोबर आहे. पण या सगळ्या पूर्वसुरींच्या गाथा आपण किती दिवस गाणार ? आता आपण काय करतो ते अधिक महत्वाचं नाही का ? आणखी काही दिवस जर माझ्याकडे लक्ष नाही दिलं तर माझी अवस्था तू कल्पनाही करू शकणार नाहीस अशी होईल. अर्थात सुदैवाने मला माझ्या सुपुत्रांकडून आशा आहे. चांगले दिवस बघायला मिळतील याची खात्री आहे. पण त्यासाठी तुम्हाला हातपाय हलवावे लागतील रे....' ' तू बघतोस ना की शाळांमधून दिवसेंदिवस मराठी भाषा हद्दपार होताना दिसते आहे. आवश्यक भाषा म्हणून काही शाळा नाईलाजाने शिकवतात ती ! मराठी माध्यमातून शिकणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस **क्रमशः**






# आनंदी पहाट

## प्रत्येक परीक्षा ही आपल्या धीराची कसोटीच

आधुनिक केसरी

विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या काया, वाचा आणि मन ह्या तीनही अंगे अभ्यासाच्या दृष्टीकोनातून, केलेल्या अभ्यासाच्या, परीक्षेतील यशासाठी महत्वाची असतात. त्या अनुषंगानं त्या तिन्हींची पुरेशी काळजी घेणं, त्यांना जपणं आवश्यक असतं. काया म्हणजे शरीर जे तंदुरुस्त ठेवणं, वाचा अर्थात आपलं बोलणं, व्यक्त होणं शुद्ध तसंच निर्मळ असलं पाहिजे आणि मन अंतर्बाह्य ( अंतर्मन आणि बहिर्मन ) स्वास्थ्यपूर्ण असणं जरुरीचं असतं. विद्यार्थ्यांनी विचार आणि वर्तन सकारात्मक करणं महत्वाचं आणि म्हणूनच आवश्यक असतं. परीक्षेच्यावेळी येणाऱ्या ताण- तणावांवर नियंत्रण मिळवणं अत्यंत जरुरीचं असतं. त्यासाठी, सहज पाळता येतील अशी काही तथ्य असणारी पथ्य विद्यार्थ्यांनी समजून घेणं उपयुक्त ठरू शकतं. नकारात्मक विचार, विषय, घटना, घडामोडी या सर्वांपासून स्वतःला दूर ठेवावं. मुलांना अभ्यासाची सवय लावण्यासाठी पालकांना बरेच परिश्रम घ्यावे लागत असतात. धाक दाखवून, चोप देऊन मुलांना अभ्यासाला बसविणाऱ्या पालकांनी सर्वप्रथम हे लक्षात ठेवावं कि, मुलांना अभ्यासाची गोडी लावण्याचं उद्दिष्ट त्या मार्गानं कधीही साध्य करता येत नसतं. त्यासाठी मुलांच्या अगदी बालपणापासूनच आपल्याला जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. केवळ अभ्यासाविषयी चर्चा करणं, त्यांच्या मनावर अभ्यासाचं दडपण निर्माण करणं, शिक्षेची दहशत निर्माण करणं, नकारार्थी, निराशावादी बोलणं, पदोपदी अपमानित करणं ह्या गोष्टी पालकांनी आवर्जून टाळणे योग्य ठरतं. प्राप्त परिस्थितीचा आनंदानं स्वीकार करून अंतर्मनाला अधिकाधिक प्रसन्न, आनंदी ठेवावं. परीक्षेच्या अनुषंगानं वेळेचं नियोजन करून प्रत्येक क्षण उपयोगात आणावा. कोणत्याही प्रकारे वेळ वाया जाणार नाही याचं भान राखावं, सतत साध्यासुध्या गोष्टीवरून चिडचिड करून नये.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

## ठेऊनिया भान | कर्म करी ||

संतांची उच्छि्छष्टे | सेविता भक्तीने ||
जाणिले तयाने | शब्दब्रह्म ||१||
भजनाचा सूर | किर्तनी रंगवा ||
अंतरी कळावा | पांडुरंग ||२||
दिंडीत वाढतो | ऐक्य भाव मनी ||
ज्ञाना तुका जनी | विठु एक ||३||
तुळशीचा गंध | उमगला ज्याला ||
साद घाली त्याला | परावाणी ||४||
उंबऱ्यात उभा | काळाच्या तू जाण ||
ठेऊनिया भान | कर्म करी ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


# निरुपण

आधुनिक केसरी

जळसोस आणी हिवारें ।गिरीविरी आणी अंधारें ।
ज्वर पाचाव आणी शारें ।या नांव आध्यात्मिक ॥२६॥
शैत्य उष्ण आणी तृषा ।क्षुधा निद्रा आणी दिशा ।
विषयतृष्णेची दुर्दशा ।या नांव आध्यात्मिक ॥२७॥
आळसी मूर्ख आणी अपेसी ।भय उद्भवे मानसीं ।
विसराळु दुश्चित्त आहिर्निशी ।या नांव आध्यात्मिक ॥२८॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मैं करता मैं भोगता, हम हमार है रुप ।
प्रकृति गुणन के कर्म को, जानत निज क्रिय रुप ।।५३।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/५३
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
प्रकृतीच्या गुणांद्वारे (सत्व, रज, तम) होणाऱ्या कर्मांनाच आत्मा आपले कर्म जाणत आहे. यांच्या स्वरूपांनाच आपले स्वरूप समजून यांच्या कर्मांना आपले कर्म आणि भोग समजत आहे. प्रकृतीच्या जड धर्माहून चेतन आत्म्याचे स्वरूप आणि त्याची क्रिया वेगळी आहे. त्रिगुणांच्या क्रियांहून आत्मा अलग वस्तू आहे. त्याचे स्वरूप आणि क्रिया चेतन आहेत.


स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# बसंत पंचमी

आधुनिक केसरी


आतां वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता । शब्दमूळ वाग्देवता । माहं माया ॥ १ ॥ श्रीराम शारदेचें मूळ स्वरुपः शारदा वेदांची माता, मुलगी ब्रह्मदेवांची, तीच्यापासून नाद उत्पन्न होतात, आणि महामाया अशी शारदा तीला मी नमस्कार करते. आज वसंत पंचमी देवी शारदा मातेचा प्रगटदिन जिच्यापासून वेद प्रगट झाले, जी ब्रह्मावर अध्यस्त आहे व जी शब्दांना जन्माला घालणारी वाग्देवता आहे तिला मी वंदन करीते. ब्रह्म मूळमाया गुणमाया, ईश्वर, जडमाया असा दृश्य सृष्टीचा उत्पत्तिक्रम शास्त्र सांगते. त्यामुळे ब्रह्मदेव, विष्णू व महेश हे अनुक्रमे रज, सत्त्व व तमोगुणात्मक ईश्वर गुणमायेचे ठरतात. म्हणून सतत चांगले बोलावे.वाईट बोलून कधीच कुणाला दुखवू नये हे या निमित्ताने सांगणे आहे. ब्रह्मदेव मूळमायेतून प्रगट होतो. मूळमाया हे शारदेचे रूप आहे. त्यामुळे 'मूळमाया ब्रह्मदेवाची मुलगी आहे' असे म्हणता येत नाही. म्हणून शारदारूप माया ब्रह्मावर भासते म्हणजे ती ब्रह्मस्वरूपावर अध्यस्तरूपाने असते. तिला अर्धांगिनी म्हणण्याऐवजी श्री समर्थांनी येथे सुता म्हणजे कन्या असे कौतुकाने म्हटले आहे. वेद ईश्वराचे 'निश्वसित' मानले जातात. ईश्वराचे वेद प्रगट करण्याचे सामर्थ्य शारदारूप असल्याने वेदांची शारदा ही माता आहे. शारदा ब्रह्मभासासह शक्ती असे समीकरण लक्षात घेतले पाहिजे. त्या शारदेलाच महामाया किंवा मूळमाया म्हणतात.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# चिकित्सा मर्यादेपर्यंतच करावी

आधुनिक केसरी

भगवंत आपलासा करून घेण्याचा प्रयत्न करावा. अभिमान सोडून जर असा प्रयत्न चालू ठेवला तर सद्गुरू कृपा झाल्याशिवाय राहात नाही. अमुक एक साधन करीत जा म्हणून सद्गुरूने सांगितले, आपण ते अट्टाहासाने करू लागलो, पण आपले विचार जर आहेत तसेच राहिले, तर भगवंताचे प्रेम येणार कसे ? चारपाच वर्षे खूप कष्ट केले, विषय बाजूला ठेवले, पण अजून कसा अनुभव येत नाही असे म्हणू लागलो, तर साधनाचा जोर कमी होतो आणि निष्ठा घसरायला लागते. जे काही होणार ते सद्गुरूच्याच इच्छेने, त्याच्याच प्रेरणेने होते, अशी आपली ठाम श्रद्धा पाहिजे. साधनाचे प्रेम तो भगवंतच देतो, हे आपण विसरून जातो. आपण पूर्वी काही साधन करीत नव्हतो, ते आता करू लागलो, असा साधनाबद्दलचा अभिमान बाळगू लागलो तर काय उपयोग ? सद्गुरूच्या पायावर एकदा डोके ठेवले की काहींचे काम होते, यात सद्गुरू पक्षपात करतात असे कसे म्हणता येईल ? आपलेच कुठेतरी चुकत असले पाहिजे याचा विचार करावा. आजवर देवाचे



नाव घेणे बरे असे वाटत होते, परंतु घ्यायचे काही जमले नाही; ते आता घेऊ लागलो हे त्याच्या कृपेने घेऊ लागलो हे नाही का समजू ? प्रपंचात मनुष्याला धीर हवा. आपण भगवंताच्या स्मरणात निर्धास्तपणे असावे. फार चिकित्सा करण्याने नुकसान होते. विद्येचे फळ काय, तर आपल्या मनाला जे बरे वाटेल त्याची चिकित्सा न करता ते करायचे, आणि आपल्याला जे करायचे नाही त्याची चिकित्सा करीत बसायचे ! चिकित्सा मर्यादेपर्यंतच असावी. ती मर्यादेबाहेर गेली की आपण काय बोलतो हे आपले आपल्यालाच कळत नाही. एक मुलगा रोज तालमीत जातो आणि चांगले दूध, तूप खातो; पण तो जर दिवसेंदिवस वाळू लागला आणि हडकुळा दिसू लागला तर त्याला काही तरी रोग आहे असे नक्की समजावे. त्याचप्रमाणे, सध्याच्या सुधारणेने माणूस पाण्यावर, हवेत, जिकडे तिकडे वेगाने जाऊ लागला आहे खरा, पण तो दिवसेंदिवस जास्त असमाधानी बनत चालला आहे; हे काही खऱ्या सुधारणेचे लक्षण नाही. परिस्थिती वाईट आली म्हणून रडू नका, कारण ती बाधतच नसते. कोणत्याही काळात, कशाही परिस्थितीत, आपल्याला आनंदरूप बनता येईल. आजपर्यंतचा आपला अनुभव पाहिला तर ' आपण केले ' असे थोडेच असते; म्हणून परिस्थितीबद्दल फारशी काळजी न करता आपण आपले कर्तव्य तेवढे करावे, आपल्या वृत्तीवर परिणाम होऊ देऊ नये. अभ्यास केला तर थोड्या दिवसांत हे साधेल.

**२५५. 'कर्ता राम आहे' असे ज्याला वाटले, त्याने सर्व काही साधले.**

# जंगली महाराज

आधुनिक केसरी

तिथे जसे बसवेश्वराचे मंदिर आहे त्याचप्रमाणे मेहबूब सुसानी या पीरांचा दर्गाही आहे. जंगली शहा हे बालपणापासूनच अत्यंत तल्लख बुद्धीचे होते. मराठी, कन्नड, उर्दू, संस्कृत आणि फार्सी या भाषा आणि मल्लविद्या यांचा त्यांनी अभ्यास केला होता. शिवाय, त्यांनी वेगवेगळ्या धर्मांचा अभ्यास केला होता.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, १६ फेब्रुवारी २०२४

adhunikkesari.com


# स्व. डॉ. मोहन धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार डॉ. सायरस पूनावाला यांना बहाल

## शरद पवार यांच्या हस्ते प्रदान; पृथ्वीराज चव्हाण, श्रीनिवास पाटील यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** वनराई' संस्थेच्या वतीने दिला जाणारा स्व. डॉ.मोहन धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार हा सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संस्थापक डॉ.सायरस पूनावाला यांना बहाल करण्यात आला.पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात घेण्यात आलेल्या कार्यक्रमातून हा पुरस्कार देशाचे माजी केंद्रिय कृषिमंत्री,पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते देण्यात आला. संस्थापक,खासदार,केंद्रीय मंत्री,नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष व स्वातंत्र्यसैनिक स्वर्गीय डॉ.मोहन धारिया यांच्या जयंतीचे औचित्य साधून डॉ.सायरस पूनावाला यांच्या कार्याची दखल घेत स्व.डॉ.मोहन धारिया राष्ट्रनिर्माण पुरस्कार हा पुरस्कार त्यांना देण्यात आला.यावेळी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे कुलपती व मुख्य सल्लागार डॉ.वेदप्रकाश मिश्रा, खासदार श्रीनिवास पाटील,वनराई पुणेचे अध्यक्ष रवींद्र धारिया,वनराई फाऊंडेशन नागपूरचे अध्यक्ष गिरीश गांधी,वनराईचे विश्वस्त गणपतराव पाटील, अजय पाटील,निलेश खांडेकर,अमित वाडेकर आदीं सह इतर उपस्थित होते.यावेळी माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्यासह डॉ.सायरस पूनावाला,पृथ्वीराज चव्हाण,गिरीश गांधी डॉ.वेदप्रकाश मिश्रा,रवींद्र धारिया आदींनी मनोगते व्यक्त केली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व.डॉ.मोहन धारिया यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहण्यात आली. तसेच व्हिडिओ द्वारे स्व.डॉ.मोहन धारिया यांच्या कार्याची माहिती दाखविण्यात आली.

डॉ.मोहन धारिया यांनी त्यांच्या कारकिर्दीत कशा पध्दतीने कार्य केले व त्यांच्या कार्याची आजच्या समाजाला कशी गरज आहे.याबद्दल शरद पवार यांनी मनोगतातून सांगितले.शिवाय त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले.डॉ.मोहन धारिया यांचे कार्य ते राष्ट्रीय योगदान देणारे कार्य असून त्यांच्याच नावाने पुरस्कार दिला जात आहे.अनेकांच्या कार्याची दखल घेत हा जो पुरस्कार वनराईच्या वतीने देण्याची पद्धत सुरू केलेली आहे ती योग्य आहे.असे सुद्धा शरद पवार यांनी म्हटले.तसेच डॉ.सायरस पूनावाला यांच्या कारकिर्दीवर सुद्धा शरद पवार यांच्याकडून प्रकाशझोत टाकण्यात आला.डॉ.सायरस पूनावाला यांच्या कार्याची दखल घेत त्यांना भारतरत्न पुरस्कार दिला पाहिजे.अशी अपेक्षा व्यक्त केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्हिडिओ द्वारे स्व. डॉ.मोहन धारिया यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना अभिवादन केले.तसेच डॉ.सायरस पूनावाला यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल अभिनंदन केले.माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सुद्धा मनोगत व्यक्त करत असताना स्व.डॉ.मोहन धारिया व सद्यस्थितीत वनराईकडून सुरू असलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले.कोरोना काळात डॉ.सायरस पूनावाला यांनी लस निर्मितीचे केलेले कार्य याबद्दल सुद्धा कौतूक करणारे विचार मांडले.रविंद्र धारिया यांनी प्रास्ताविक करताना म्हटले की,गुजरात, कर्नाटक,गोवा आदी राज्यातून वनराईचे कार्य सूरु आहे.वनराईच्या कामाने अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे.लाखो ग्रामस्थांना फायदा होत आहे. असे सुद्धा त्यांनी म्हटले.बाळगंधर्व मंदिराच्या बाहेर रांगोळी काढून स्व.डॉ.मोहन धारिया यांना अभिवादन करण्यात आले होते.शिवाय या पूर्वी ज्यांना पुरस्कार देण्यात आले होते.अशा सर्वांचे छोटे छोटे फ्लेस लावण्यात आले होते.हे जन्मशताब्दी वर्ष जल वन मोहन वर्ष म्हणून वनराईच्या वतीने विविध उपक्रम हाती घेतले जाणार आहेत.यावेळी महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या लोकांनी हजेरी लावली होती. वनराईच्या कार्यास पुढे घेऊन जाणारे हितचिंतक तसेच विविध गावचे सरपंच पदाधिकारी व ग्रामस्थ सुद्धा उपस्थित होते.



# ज्ञानोपासक विद्यालयात स्वयंशासनदिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नेमीनाथ जैन**

**बोरी :** येथील ज्ञानोपासक द्यालयातयाल स्वयंशासन दिनानिमित्त शाळेच्या विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शाळेचा संपूर्ण कार्यभार यशस्वीरीत्या सांभाळला. शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका दुर्गा देशमुख होत्या. जैन वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जैन, पत्रकार संतोष तायडे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वतीच्या पूजनाने परिपाठाची सुरूवात करण्यात आली. यावेळी पाहण्यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठीच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर प्रत्यक्ष शाळेच्या कार्यभरास सुरुवात झाली. फार मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी यामध्ये सहभाग नोंदवला. या प्रसंगी मुख्याध्यापक माध्यमिक म्हणून सुमित ढोले यांनी तर उपमुख्याध्यापक म्हणून यश गोरे यांनी काम पाहिले. पर्यवेक्षक म्हणून आदिती भोसले, प्राथमिकचे मुख्याध्यापक म्हणून सर्वज्ञ वाघमारे, प्रशासकीय अधिकारी म्हणून स्वराज डोंबे, ग्रंथपाल म्हणून मोहन पावडे, क्रीडा शिक्षक म्हणून जय हुडेकर व दिव्यांश ओझा यांनी काम पाहिले. सेवक म्हणून रोहित गोरे, मुकेश खिस्ते, नारायण इंगोले, लिपिक म्हणून करण हरकळ यांनी आपले कर्तव्य पार पाडले.

या कार्यक्रमात एकूण ६५ विद्यार्थीनीं व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख दत्तात्रय जाधव, रमेश भारती, राजेश ढोबळे, अशोक भोसले, प्रशांत भरणे, नरेंद्र टाले, मनोहर सोनवळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# सुप्रिया सुळेंचा भाजपावर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बंडामुळे राष्ट्रवादी पक्षाची शकलं झाली आहेत. या पक्षात उघड-उघड अजित पवार समर्थक आणि शरद पवार समर्थक असे दोन गट पडले आहेत. दरम्यान, ईडी, सीबीआयच्या कारवाईला घाबरून राष्ट्रवादीच्या अनेक आमदारांनी अजित पवार यांच्या गटात जाणे पसंद केले, असा दावा शरद पवार गटाकडून केला जातोय.

यावरच शरद पवार गटाच्या नेत्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली. यासह देशात पेटीएमच्या माध्यमातून तब्बल २७ हजार कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आला आहे, असा दावा त्यांनी केला. भाजपावर टीका करताना त्यांनी गावातल्या लहान मुलालादेखील आता ईडी काय आहे? हे माहिती झाले आहे, अशी मिश्किल टिप्पणी केली. त्या मुंबईत राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) कार्यकर्त्यांना संबोधित करत होत्या.

# 'नानां'चा उबाठाला जय महाराष्ट्र ?

आधुनिक केसरी

*शिर्डी मतदारसंघातून खासदारकीच्या उमेदवारीवरून नाराज असलेले माजी मंत्री बबननाना घोलप लवकरच उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला सोडचिट्ठी देणार असल्याची चर्चा नाशिक मध्ये होती. त्यांनी उबाठा गटाचे उपनेते पद सोडून व नंतर प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देऊन या चर्चेला बळ दिले आहे आणि भावी वाटचाल आपण भाजप किंवा एकनाथ शिंदे यांच्या सोबतीने करणार असल्याचेही आपल्या कृतीने दाखवून दिले आहे. उद्धव ठाकरे शिर्डी दौऱ्यावर असतानाच बबन घोलप यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन आपण वेगळया राजकीय मार्गावरून भविष्यात आपलं मार्गक्रमण करणार असल्याचे संकेत दिले होते. नाशिकरोड देवळाली विधानसभा मतदारसंघातून तब्बल पाच वेळेस आमदारकी करणारे व पाच वर्ष महाराष्ट्र मंत्रिमंडळात मंत्रीपद भूषविणारे बबननाना घोलप हे नाशिक देवळाली मधील एक वजनदार राजकीय व्यक्तिमत्व आहे.*



**बाजीराव सोनवणे**



गत विधानसभा निवडणुकीत बबन घोलप यांचे सुपुत्र योगेश घोलप यांचा राष्ट्रवादीच्या उमेदवार सरोज अहिरे यांनी पराभव केला आणि बबन नाना घोलप यांच्या या मतदार संघातील वर्चस्वला तडा दिला. शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने नानांनी राजकीय सुवर्णकाळ अनुभवला परंतु माणूस कितीही मोठा असो कोणत्याही क्षेत्रातील असो यशो शिखर गाठले की त्यापुढे एकतर शिखरावर टिकून राहणे किंवा उताराच्या दिशेने वाटचालीस प्रारंभ अपवाद कसा ठरतील.

गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या राजकीय अस्तित्वाची लढाई ते लढत आहेत. त्यांची कन्या तनुजा घोलप हिने काही दिवसांपूर्वी भाजपची जवळीक साधली परंतु ही जवळीक साधूनही काही हाती लागत नाही असे नानांच्या लक्षात आले. शिर्डीत आपण विजय मिळवून

दिल्ली गाठू शकतो असा नानांना विश्वास होता परंतु उद्धव ठाकरे यांना ते मान्य नसावे. शिर्डीत भाऊसाहेब वाकचौरे यांना ठाकरे यांनी जवळ केले आणि घोलप यांच्या वाटेत काट्यांची पेरणी केली.आता प्रश्न असा पडतो की शिंदे यांच्याशी जवळीक साधून घोलप यांच्या पदरात काय पडणार? खासदारकीसाठी शिर्डी आणि नाशिक लोकसभा मतदारसंघातून आधीच अनेक दिग्गज नेते मैदानात उतरलेले आहेत अशा परिस्थितीत लोकसभेसाठी घोलप यांच्या नावाचा किती विचार होतो ही बाब येणारा काळच ठरवेल. लोकसभेनंतर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी ही नाना स्वतः किंवा मुलगा,मुलगी यांच्या माध्यमातून इच्छुक आहेत परंतु रोज वाढणारी पक्षांची आणि त्या निमित्ताने इच्छुकांची संख्या पाहता विधानसभा निवडणुकीत कुणाकडून ते आपले उमेदवारी निश्चित करतात आणि कोणते राजकीय कसब वापरून ते निवडून येतात हे पाहणे मोठे रंजक ठरणार आहे. याआधी शिवसेना व माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या माध्यमातून बबन नाना यांना आमदारकी आणि त्यानंतर मंत्रिपद आणि मुलीला नाशिक महानगराचे महापौरपद,अशी अनेक पदे प्राप्त झाली. महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती मोठ्या वेगाने बदलते आहे,या बदलत्या परिस्थितीत बबन घोलपच काय पण बड्याबड्यांच्या तोंडाला निवडणुकीच्या मैदानात फेस येण्याची शक्यता आहे. आजच ही चर्चा सुरु असताना नानाचा एक कट्टर समर्थक भेटला,त्याने वेगळेच राजकीय गणित मांडले प्रमुख राजकीय पक्षांच्या लठ्ठालठठीत नानांनी वंचित आघाडीचा विचार करावा. नाशिकरोड -देवळाली मतदार संघात वंचित विचाराचा मोठा मतदार असल्यामुळे नानांची पुढचे मार्गक्रमण सोपे होईल. असो पाहूया भविष्यात काय घडते ते.



## इंडिया आघाडीला धक्का

आधुनिक केसरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारचा पराभव करण्यासाठी काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीने २६ पक्षांची मोट बांधली होती. या आघाडीला इंडिया आघाडी असे नाव देण्यात आले. मात्र लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच जागा वाटपाच्या मुद्द्यावरून इंडिया आघाडीतील मतभेद उघड होत आहेत. नितीश कुमार यांच्या जनता दल (युनायटेड) पक्षाने बिहारमध्ये थेट भाजपाबरोबर सरकार स्थापन करून आघाडीला पहिला धक्का दिला. त्यानंतर ममता बॅनर्जी आणि अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेसशी जागावाटपावरून मतभेद असल्याचे उघड केले. त्यानंतर आता जम्मू आणि काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्स या पक्षानेही स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याची घोषणा केली आहे. नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे प्रमुख फारूख अब्दुल्ला यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन आगामी लोकसभा निवडणुकीत त्यांचा पक्ष स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले. तसेच लोकसभा निवडणुकीबरोबरच जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकांचीही घोषणा होण्याची शक्यता आहे, असेही ते म्हणाले. पत्रकार परिषदेत बोलत असताना अब्दुल्ला म्हणाले, "जागावाटपाचा प्रश्नच येत नाही, नॅशनल कॉन्फरन्स पक्ष निःसंशय स्वबळावर निवडणूक लढविणार आहे. या महिन्याच्या सुरुवातीलाच पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी पंजाबमध्ये आप स्वबळावर निवडणूक लढणार असल्याचे सांगितले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यातील जागावाटपाबाबत काँग्रेशसी कोणतीही चर्चा होणार नसल्याची घोषणा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी भगवंत मान यांनी स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले होते. फारूख अब्दुल्ला यांनी नुकतीच इंडिया टुडे वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. या मुलाखतीत फारूख अब्दुल्ला म्हणाले की, इंडिया आघाडीतील जागावाटपाची चर्चा निष्फळ ठरलेली आहे. त्यामुळे आम्ही स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेत आहोत, असे फारूख अब्दुल्ला यांनी जाहीर केले होते. तसेच एनडीए आघाडीत परतण्याच्या प्रश्नावर त्यांनी स्पष्ट भूमिका मांडली नाही. तसेच याचा विरोधही केला नाही. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात नॅशनल कॉन्फरन्स पक्ष एनडीएचा घटक पक्ष होता. मागच्या महिन्यात नॅशनल कॉन्फरन्सचे काही महत्त्वाचे नेते यांनी भाजपामध्ये प्रवेश केला होता. त्या पार्श्वभूमीवर फारूख अब्दुल्ला यांनी मोठा निर्णय घेतल्याचे मानले जाते. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि नॅशनल कॉन्फरन्स या पक्षांनी प्रत्येकी तीन जागा जिंकल्या होत्या.

## निखिल वागळे मविआचे प्रवक्ता का होत नाहीत ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**कसं आहे? चिखलात दगड टाकला की आपल्या अंगावर शिंतोडे उडणार, विस्तवाला हात लावला की चटका बसणार? वाहत्या पाण्याच्या प्रवाहात पाय टाकला की पाणी ओढणार, तसंच काही सद्या चर्चेत आलेल्या पत्रकार निखिल वागळे बाबतीत झालं म्हणायला हरकत नाही. पत्रपंडीत कधी कधी स्वत:ची बुद्धी क्षमता जगा वेगळी जेव्हा समजतात तेव्हा त्याचे प्रदर्शन देखील वेगवेगळ्या कांगोराने पुढे येतं. लालकृष्ण आडवाणी यांना भारतरत्न पुरस्कार दिला त्यावर हे महाशय म्हणतात की, एका दंगलखोराने दुसऱ्या दंगलखोराला दिलेली शाब्बासकी असं वर्णन जर पुरस्काराचं स्वत:ला विचारवंत म्हणुन घेणारा पत्रकार करत असेल तर नवी पिढी आदर्श तरी काय घेणार?**



अनेक वर्षे आडवळणीला पडल्यानंतर प्रसिद्धीसाठी काही तरी करायचं याच मानसिकतेतुन पुण्यातल्या सुजाण नागरिकांना निर्भय बनवण्यासाठी गेलेल्या वागळेंवर हल्ला झाला. त्याचे समर्थन कुणीच करू शकत नाही. कारण लोकशाहीच्या पवित्र मंदिरात कायदा हाता घेता कामा नये. तो नेमका याच कारणासाठी झाला ज्या प्रकारची आग तोंडी ओकुन मुंबई सोडलेले वागळे पुण्यात आले. तिथे आगीची झळ पोहोचली. परिणामी मागारी गेले. या सर्व घटनाक्रमात त्यांना मिळालेली प्रसिद्धी याच आत्मसमाधानासाठी केलेला खटाटोप मार्गी लागला असं म्हटलं तर चुकीचे ठरणार नाही. निखील वागळे पत्रकार म्हणुन ओळखले जातात. वेगवेगळ्या दैनिकात संपादक पदावर केलेले काम किंवा इलेक्ट्रॉनिक मिडियात देखील केलेले काम. साठी पार झालेले वागळे पाच-सहा वर्षांपासुन ज्यांचे नाव कुठेच घेतल्या जात नव्हतं. कदाचित हीच उणीव त्यांना भासत असावी. त्यांच्या लेखणीचा बाणा भल्याभल्यांना माहिती नाही असं नाही. चळवळीत काम करणारे आणि स्वतःला विचारवंत म्हणुन घेणारे वागळे होय. काही माणसांचे स्वभाव स्पष्ट, परखड असतात. त्यांच्या अंगी अहंमपणा देखील असतो. असं त्यांना अनेकदा वाटतं की, महाराष्ट्राचं राजकारण माझ्या ईशाऱ्यावर चालायचं नव्हे चालतं. वागळेसारखे अनेक आजही संपादक ज्यांच्या स्वभावात अशाच प्रकारचा आविर्भाव आढळुन येतो. वास्तविक पहाता पत्रकारांनी राजकारणाच्या भानगडीत पडता कामा नये? आणि पडायचं झालं तर थेट एखाद्या पक्षात प्रवेश करणे योग्य. सत्ताधारी आणि विरोधक असं चित्र राजकारणाचं असतं. पत्रकार देखील विरोधी पक्षासारखेच भुमिकेत काम करतात. पण तो काळ सद्याचा नाही हा भाग वेगळा. सत्ताधाऱ्यांना चांगल्या सुचना देखील पत्रकार करू शकतात. पुर्वार्ध यासाठी सांगितला की, मागच्या आठवड्यात केंद्र सरकारने भाजपाचे जेष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी यांना भारतरत्न पुरस्कार दिला ज्याचे स्वागत देशातील सर्व पक्षाच्या लोकांनी तथा सामान्य जनतेने केले. कारण तेवढी त्यांची योग्यताच आहे जे की पुरस्कार प्राप्तीसाठी ते धनी ठरतात. अर्थात व्यवस्था बदल झाला म्हणूनच त्यांना पुरस्कार मिळाला तो भाग वेगळा. काँग्रेसनं हे पुण्य कर्म कधी केलंच नसतं हे तितकंच खरं. त्यांना पुरस्कार मिळाला अन् वागळेंच्या बुडालाच आग लागली. जणु काही यांच्या घरावर कुणी बाँब फेकला अगदी उद्विग्न होवुन त्यांनी पुरस्काराचं वर्णन उल्लेख केल्याप्रमाणे केलं. ज्याचा संताप केवळ भाजपाच्या कार्यकर्त्यांच्या मनात नव्हे तर सामान्य जनतेला देखील झाला. एक दंगलखोर, दुसरा दंगलखोर एवढी नीच पातळी वागळेंनी गाठली. जणु काही मानसिकता मनोरूग्ण झाल्यासारखीच म्हणावी लागेल. खरं तर पत्रकाराने व्यवस्थेच्या चांगल्या उपक्रमाचे देखील कौतुक करायला हवं. हे वाक्य कदाचित विरोधकांनी म्हटलं असतं तर राजकारणातला विरोध म्हणुन ग्राह्य धरल्या असतं. पण एक पत्रकार अशा प्रकारे बोलुन जातो. अगदी लोकशाहीलाच आग लागण्यासारखी भाषा करतो हे देखील कीव येण्यासारखं म्हणावं लागेल. ते का बोलले? कशामुळे सोशल मिडियावर व्यक्त झाले? अभिव्यक्ती स्वातंत्र्य जरूर आहे पण त्याचा अतिरेक त्यांनी का केला? कदाचित प्रसिद्धीचा भाग असु शकतो. देशाच्या सर्वोच्च स्थानावर बसलेल्या व्यक्तीविषयी मुर्खपणाची भाषा वापरणे हा देखील रावणी आविर्भाव मनी असु शकतो. परवा निखील वागळे पुण्यातल्या सुजाण नागरिकांना निर्भय बनवण्यासाठी भाषण द्यायला येवुन गेले. विश्वांभर चौधरी, असीम सरवदे ही मंडळी सोबत होती. वास्तविक पहाता कार्यक्रम जाहिर झाला तेव्हा मी येतोय आणि येणारच अशा प्रकारची वागळेंची भुमिका होती. आपण तोंडातुन ओकलेली आग समाजात पसरते याची जाणिव त्यांना होती. पोलीसांनी ज्याची पुर्वकल्पना देखील दिली होती. पण सद्या काहीही केलं तरी प्रसिद्धी मिळु शकते हा अंदाज त्यांना होताच. याचसाठी केला होता अट्टाहास या उक्तीप्रमाणे पुण्यात आले, त्यांच्यावर हल्ला झाला, त्याचे समर्थन कुणीच करू शकत नाही. गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी हल्लेखोरावर कठोर कारवाईचे निर्देश दिले. निर्भय सभेला महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संरक्षण दिले होते. गंमत बघा, ही मंडळी आम्ही कोणत्याही पक्षात नाहीत हे सांगताना त्यांच्या सभा जाहिरपणे विरोधी पक्षातील मंडळी घेतात. मग ही मंडळी राजकारणात थेट प्रवेश का करत नाहीत? निखील वागळेंच पुण्यातलं भाषण समाजातील विचारवंत म्हणुन झालं नाही तर विरोधी पक्षाचा प्रवक्ता या आविर्भावात त्यांनी सत्ताधाऱ्यावर टिका केली. जातीपात आणि व्यक्तिद्वेषाचे राजकारण करणारे शरद पवार वागळेंना सुसंस्कृत नेते वाटतात हे त्यांनी भाषणात बोलुन दाखवलं. मग वागळे महाविकास आघाडीत थेट प्रवेश करून प्रवक्ता का होत नाहीत? असा सवाल पुण्यातीलच जनतेनं त्यांना केला. राजकारण अलिप्त विचारवंतांची चळवळ हा महाराष्ट्राच्या लोकशाही अभिव्यक्ती स्वातंत्र्यातला सुवर्णकाळ देखील होवुन गेलेला आहेच. पण अशा चळवळीत काम करणारी मंडळी एखाद्या राजकिय पक्षाची सुपारी घेतल्यासारखी भाषा करते तेव्हा विचारवंतांचीच कीव येते. पुण्यात झालेला वागळे ड्रामा ज्याला महाविकास आघाडीच्या नेत्यांचा पडद्यामागे नटेश्वर होता हे लपुन राहिलेले नाही. आपल्या जाण्यानं संघर्ष वाढत असेल तर खरा विचारवंत तिथे गेलाच नसता.कदाचित कार्यक्रम पुन्हा पुढे ढकलुन घेतला असता. पण वागळेंना हा सारा ड्रामा घडवुन देखील आणायचाच होता की काय? अशी शंका आता लोकच घेवु लागले. कारण मागच्या पाच-दहा वर्षात प्रसिद्धी पत्रापासुन सन्माननिय वागळे बरेच दुर गेलेले होते. यासाठीच केला होता अट्टाहास? असो. दुसरा एक प्रश्न खऱ्या अर्थाने वागळेंना विचारायला हवा लालकृष्ण आडवाणींना पुरस्कार दिल्यानंतर तुमच्या बुडाला आग लागली. मग पुन्हा केंद्र सरकारने माजी पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव, शेतकरी नेते चरणसिंग चौधरी, सहकार नेते रघुनाथन यांना भारतरत्न पुरस्कार जाहिर केले. मग का हो तुमची दातखिळी बसली? ज्यावर तुम्ही चिकार शब्द काढला नाही. शेवटी आपण विचारवंत म्हणवुन घेतो आणि राजकारणाला अपेक्षित कृती करतो तेव्हा समाज देखील तुमच्या अंगातले आणि स्वभावातले रंगढंग गुणात्मकरीत्या पडताळुन पाहिल्याशिवाय रहात नाही हे तितकंच खरं. यापेक्षा थेट निखिल वागळेंनी महाविकास आघाडीत प्रवेशकर्ता होवुन प्रवक्ता पदाची जबाबदारी स्विकारलेली बरं नव्हे का?

## जीवनाचा उध्दार करणारे खरे संत लोकांना लवकर कळत नाहीत



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**माणुस हा खुपचं विचित्र प्राणी आहे. आजारी असला कि वैद्य किंवा दवाखाना शोधतो. भौतिक सुबत्ता प्राप्त होण्यासाठी मंदिर संत चमत्कार शोधत असतो. पण जीवनाचा खरया अर्थाने उद्धार होईल असे संत आपल्याला लवकर समजतं नाहीत सापडत नाहीत हे संतांचं नाही तर आपलं दुर्भाग्य आहे. सत्य हे समजण्यासाठी उमजण्यासाठी पचण्यासाठी कठिणच असतं.या उलट असत्य खुप लवकर समजतं खुप लवकर उमजत पचण तर क्षणात होऊन अंगवळणी देखील पडतं. म्हणजे बाब कोणतीही असेल सत्य आणि असत्य या नुसारच त्या बाबीच महत्व अभाव प्रभाव असतो. पण तो समजण्यासाठी अगोदर फरक समजण गरजेचं असतं. आस्था श्रद्धा,हि वेगळी असते .त्याला  निस्वार्थ भाव हि जोड असते.**

हेतु उदेश मग तो कोणाताही असेल लाभ , स्वार्थ भिती या पैकी येणकेन कोणत्याही कारणाने आपण अथवा संत शोधतो तेव्हा त्या भिती पोटी मंदिरात जाण वेगळं आणि काही अपेक्षा नसताना जाण वेगळं असतं.अपेक्षा डोक्यात असणं संकटं समोर उभा असण किंवा संकटाची अडचणीची चाहुल लागण अशा वेळी आपल्या कडे असणार्या सर्व शक्तिचा प्रभाव अपुरा पडला कि आपण दैव शक्ति शोधतो. दैव शक्ति शोधताना मग मंदिरा समोरच सोबतच आपल्याला आपली समस्या अडचण क्षणार्धात सुटेल असे संत अपेक्षित असतात . यातुनच आपण चमत्काराची अपेक्षा बाळगतो.मुळात जीवनाचा खरया अर्थाने उद्धार होईल असे संत आपल्याला लवकर सापडत नाहीत आणि सापडले तर ते आपल्याला कळत नाहीत आणि कळले तर पचत नाहीत हिच विद्यमान युगातील खुप मोठी दुर्भाग्य पुर्ण स्थिती आहे.कर्म भोग या सृष्टी वर कोणालाही चुकणार नाहीत जसं कर्म तसं फळ आणि याच दरम्यान कर्म करताना काळा आपला साथीदार असतो.जीवनाच्या मार्गावर अनेक भौतिक सेवा सुविधा अर्जित करताना अनेक इच्छा पुर्ण होऊ शकतात अनेक इच्छा अपुरया राहु शकतात आणि भौतिक जीवनातील संसाधन निर्माण करण्यासाठी आपण अनेकदा अध्यात्माशी जोडले जाते.तर अनेक अपयशाचा सामना केल्यानंतर आपल्याला चमत्काराची अपेक्षा असते तेव्हा आपण या बाबींशी जोडले जातो.एखादी आपल्या जीवनातील घटना घडामोड हि घडणारच असते.पण एवढा संयम आपल्याकडं नसतो . ज्याठिकाणी आपल्याला संयम आणि आश्वासन आणि आशिर्वाद मिळतात याला आपण चमत्कार समजतो . वास्तविक मंदीर कोणतही असु द्या त्या  ठिकाणी प्रचंड सकारात्मक उर्जा असते.संत कोणतेही असतील त्यांच्या कडे प्रचंड अशी सकारात्मक शक्ति असते . नकारात्मक कोणत्याही शक्तिला वाव नसतो . त्या अनुषंगाने अनेक ठिकाणी आपण खूप मोठ्या आशेने पोहचल्यावर आपल्या इच्छा योगायोगाने पुर्ण होतात.इथं पर्यंत आक्षेपार्ह कहीच नाही.पण दैनंदिन श्रद्धेला जेव्हा चमत्कारांचे भास होतात आणि आपलं जीवन बदल पाहिजे,पैसा सत्ता संपत्ती प्रतिष्ठा, नावलौकिक यासाठी ,देवाचे आशिर्वाद किंवा संत कृपा झाली पाहिजे.मग इथूनच एक वेगळा प्रवास सुरू होतो आणि हा स्वार्था ने सुरु झालेला प्रवास एक वेळी एका बिंदूवर येऊन थांबतो.आणि तिथुनच मग वेगळी ठिणगी पडते.आणि त्याला वादाची फसवणुकीपासून अनेक आरोप प्रत्यारोपाची किनर लागते.पण मुळात आपल्याला काय शोधन गरजेचे आहे आणि आपण काय शोधतोय आपण जे शोधतोय ते आपल्याला तसंच मिळणार आहे. आपला मुळात शोध चुकीचा आहे आणि चुकीच्या मार्गाने पद्धतीने आपण योग्य मार्ग शोधतोय हे गणित स्वप्नात सुद्धा जुळणयासारख नाही ते आपण वास्तवात जुळतोय म्हणजे आपण किती विद्वान ज्ञानी पंडित आहेत.मुळात आपला जन्म कशासाठी झाला आहे हे समजलं पाहिजे आणि संत हे आपल्याला आपल्या जीवनाची खरी ओळख करून देतात. आणि जीवनाचा आत्म उध्दार होण्यासाठी मार्गदर्शन करत असतात.पण सध्या माणसं आर्थिक सुबत्ता आणि जीवनातील समस्या यासाठीच जास्तीत जास्त आकर्षित होत आहेत आणि इथुनच नविन धार्मिक युग निर्माण होत आहे. या नवयुगात कही घटना घडामोडी वेगवेगळ्या पद्धतीने घडु शकतात याचं अर्थ अध्यात्म आणि संत परंपरा हि चुकीची नाही तर मुळात आपण चुकीच्या ठिकाणी पोहचता कामा नये. मुळ अध्यात्म हा प्रांत वेगळा आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२,  छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सरकार मायबापा आम्हाला न्याय केव्हा मिळणार ?

## मोहिदेपूरच्या नाथ जोगी समाजातील स्त्रियांचा आक्रोश

आधुनिक केसरी

*2012 साली नागपूर शहरातील कळमना मार्केट मधील भरत नगरात भर दिवसा तिहेरी हत्याकांड घडले. अक्षरशः दगडाने ठेचून जमावाने तीन तरुणांचा खून केला. बहरुप्याच सोंग घेवून भिक्षा मागण्यासाठी गेलेल्या त्या तरुणांना चोर समजून त्यांना जीव जाईस्तोवर मारहाण केली.जळगाव तालुक्यातील मोहिदीपूर येथील हे चार तरूण गावात हाताला कुठलच काम नसल्याने कुटुबांच पोट भरण्यासाठी यांनी थेट नागपूर गाठलं.पण नशिबात काही वेगळच लिहिलं होतं. 2012 साली 9 जून ला नाथजोगी समाजातील हे चार तरुण सकाळी 9 वाजेच्या दरम्यान कळमना मार्केट मधील भरत नगरात फिरत असतांना त्यांना चोर समजून लोकांनी अमानुषपणे त्यांना मारहाण केली.त्यात तिघांचा जागीच जीव गेला तर एक तरुण नशिब बलवत्तर म्हणून बचावला.*

नाथ जोगी समाज हा उघड्यावर पाल मांडून राहणारा.उदरनिर्वाच कुठलंच साधन या समाजाकडे नाही. भिक्षा मागून आपल्या कुटुंबाचं पालन पोषण करणारा हा समाज. हा समाज महाराष्ट्रात बोटावर मोजणे इतपत. बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील मोहिदीपूर हे एक छोटसं गाव. सातपुडा डोंगराच्या पायथ्याशी वसलेलं.या गावांमध्ये बहुतांश लोक नाथजोगी समाजाचे. या समाजाचे उत्पन्नाचे साधन खांद्यावर झोळी आणि गावोगावी व शहरो-शहरी फिरून भीक मागने. आज या समाजाची थोडीफार परिस्थिती बदलली असली तरीही अजूनही हा समाज अठरा विश्व दारिद्र्यात खितपत पडलेला आहे. शिक्षणाचे प्रमाण फारच अत्यल्प, उत्पन्नाचं कुठलंच प्रमुख साधन नाही. त्यामुळे अजूनही हा समाज गरिबीचं जिनं जगताना आपल्याला पहावयास मिळतो. जळगाव जामोद, आसलगाव सारख्या बाजारात राजरोजसपणे ही लोक खांद्यावर झोळी घेऊन भीक मागताना दिसतात. पुरुषासोबतच काही प्रमाणात स्त्रिया सुद्धा भिक्षा मागताना नजरेस पडतात. काही तरुण बहुरूप्याच सोंग घेऊन जळगाव, संग्रामपूर,वरवट, नांदुरा यासारख्या शहरी भागात खांद्यावर झोळ घेवून भिक्षा मागतात.स्वतंत्र भारतात अजूनही हा समाज पारतंत्र्याचे जीवन जगतो की काय असा प्रश्न मनात कायम भिरभिरत राहतो.या समाजाच्या मूलभूत गरजा आजही पूर्ण होत नसतील तर नक्कीच गौरवशाली भारतासाठी ही बाब चिंतनाचा विषय आहे. लोकप्रतिनिधींनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. या लोकांच्या हाताला कायमस्वरूपी काम मिळालं पाहिजे. त्यांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या पाहिजे. यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची नितांत गरज आहे. शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने त्या समाजाचा पाहिजे तेवढा विकास झाला नाही.आजरोजी काही मुलं मुली उच्च शिक्षण घेत आहेत. थोड्याफार लोकांजवळ जमिनी आहेत परंतु गावातील इतर लोकांजवळ उत्पन्नाचं कुठलंच साधन नाही.त्यामुळे या समाजातील बहुतांश लोक गावोगावी जाऊन भिक्षा मागून पोट भरतात.

असं म्हटल्या जाते की पुर्वी मोहिदेपूर गावात हत्तीचा बाजार भरत होता. त्यामुळे ऐतिहासिक दृष्ट्या हे गाव फार महत्त्वाचे आहे. परंतु आज रोजी या गावात जीवन जगणारा हा समाज हलाखीचं जीवन जगत आहे. या गावासाठी सामाजिक संस्थांनी पुढे आलं पाहिजे. या समाजाच्या कल्याणासाठी विविध उपक्रम इथं राबवल्या गेले पाहिजे. डॉक्टर संजय खडसे जळगाव जामोद चे उपविभागीय अधिकारी असताना त्यांनी या गावाकडे विशेष लक्ष दिले. त्या लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी पुरेपूर प्रयत्न केले. प्रत्येक दिवाळीला भाऊबीजेच्या दिवशी या लोकांमध्ये जाऊन डॉक्टर संजय खडसे आजही भाऊबीजेचा सण मोठ्या थाटामाटात साजरा करतात. थोडीफार मदतही या कुटुंबांना त्यांच्याकडून केल्या जाते. डॉक्टर संजय खडसे यांचे कार्य प्रेरणादायी असून त्यांच्याकडून समाजातील इतर अधिकारी आणि दानशूर लोकांनी त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत या लोकांना मदत केली पाहिजे.

महाराष्ट्रात या समाजातील लोकांवर अन्याय अत्याचाराच्या बऱ्याच घटना घडल्या आहेत. त्यातीलच एक नागपूर हत्याकांड ज्यामध्ये सुपडा नागनाथ, पंजाबराव शिंदे, हसन सोळंके या




तीन तरुणांचा जमावाने दगडाने ठेचून खून केला. त्यातील एक व्यक्ती कसाबसा बचावला. घरातील कर्ता पुरुष गेल्याने या समाजातील कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. अजूनही नागपूर हत्याकांडाची फाईल कोर्टात धूळ खात पडलेली आहे. शासनाकडून या कुटुंबांना पाहिजे तशी मदत मिळाली नाही त्यामुळे आज रोजी या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. रायगड जिल्ह्यातील उरण येथे तेजराव सोळंके या तरुणाचा खून करून रस्त्याच्या कडेला फेकून दिले.अकोला जिल्ह्यातील बार्शी टाकळी तालुक्यातील दगड पारवा गावातही चोर समजून जमावाने तरूणांची हत्या केली.अशाप्रकारे पुरोगामी महाराष्ट्रात या समाजावर अन्याय अत्याचाराच्या श्रृंखला दिवसेंदिवस वाढतच आहेत. त्यामुळे मायबाप सरकारने या समाजाकडे लक्ष देवून या समाजाला न्याय मिळवून द्यावा.

अजूनही नागपूर हत्याकांडाची धग कायम आहे. नागपूर हत्याकांडांचा निकाल लवकरात लवकर लावावा व या हत्याकांडात मरण पावलेल्या कुटुंबांना प्रत्येकी 25 लाख रुपये मदत देण्यात यावी.या समाजाच्या हाताला कायमस्वरूपी काम मिळावं. या समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावं. प्रत्येकाल घरकुल योजनेचा लाभ द्यावा.भीक्षेवर जीवंत जगणाऱ्या या लोकांचे गावगुंडांनपासून संरक्षण व्हावे. उदरनिर्वाहाचे साधन म्हणून त्यांना दोन हेक्टर जमीन द्यावी.अशा विविध मागण्यांसाठी मोहिदेपूर येथील महिलांनी जळगाव जामोद येथील तहसील कार्यालयावर १२ फेब्रुवारी रोजी एक दिवसीय धरणे आंदोलनाच केले.

प्रत्यक्ष धरणे आंदोलनात सहभागी झालेल्या त्या अत्याचार ग्रस्त कुटुंबातील महिलांच्या डोळ्यातून अश्रू येत होते.नागपूर हत्याकांडाची आपबिती सांगताना त्यांना गहिवरून येतं होते.2012 साली त्यांच्या घरातील कर्त्या पुरुषांची जमावाने हत्या केल्यानंतर आज पर्यंत त्या कुटुंबांला शासनाने पाहिजे तशी मदत केली नाही.त्यामुळेच १२ वर्षाचा एवढा मोठा कालावधी उलटूनही त्यांच्या पदरात मात्र आश्वासनाव्यतिरिक्त काहीच पडलं नाही.

खरच शाहू फुले आंबेडकरांच्या या महाराष्ट्रात अन्याय अत्याचाराच्या घटना थांबतील का. ? राजरोजसपणे दिवसाढवळ्या अत्याचाराच्या या घटनांना जबाबदार कोण? नागपूर हत्याकांडातील त्या मारेकऱ्यांना शिक्षा होईल का? मोहिदेपूर सारख्या ग्रामीण भागात जीवन जगणाऱ्या या समाजाचा कायापालट केव्हा होईल.? अजूनही गरिबीचं जिना वाट्याला आलेल्या या समाजाला सोन्याचे दिवस केव्हा येतील.?बारा वर्षानंतरही आपल्या मागण्यांसाठी भर उन्हात तहसील कार्यालयासमोर आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या मोहिदीपूर येथील महिलांना न्याय मिळेल का.?की फक्त आश्वासनावरच त्यांची बोळवण केली जाईल.इथलं मायबाप सरकार या महिलांना न्याय मिळवून देईल का.? जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान लोकप्रतिनिधी माजी मंत्री डॉक्टर संजय कुटे साहेब या महिलांच्या पाठीमागे खंबीर उभे राहतील का.? प्रश्न अनेक असले तरीही मोहिदेपूरच्या त्या अन्यायग्रस्त अत्याचार ग्रस्त कुटुंबांना न्याय मिळाला पाहिजे.त्यांच्या आयुष्यात समृद्धीची सकाळ उगवली पाहिजे. त्यांच्या जगण्याला भंक्कम आधार मिळाला पाहिजे.तरच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा विजय होईल.आणि बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहिचं पाहिलेलं स्वप्न"लोकांनी लोकांकडून लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही राज्य"पूर्णत्वास जाईल.



सागरकुमार झनके
संपर्क क्र. 9822575244



# हाय प्रोफाईल सेक्स रॅकेट उघडकीस

## पीडित मुलींची सुटका : दोघांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** तात्कालिन उपविभागीय अधिकारी संदिप मिटके यांनी अवैध वेश्या व्यवसाय रोखण्यासाठी मोठे प्रयत्न केले काही प्रमाणात यश मिळाले तरी अजुनही शिर्डी सह उपविभागात हा व्यवसाय परराज्यातील मुली आणुन सुरू असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

बुधवार दिनांक १४ फेब्रुवारी रोजी उपविभागीय अधिकारी शिरिष वमने यांना पिंपरी निर्मळ शिवारात नगर मनमाड रोडवर हॉटेल साई श्रद्धा येथे हाय प्रोफाईल सेक्स रॅकेट चालवून वेश्याव्यवसाय करून घेतल्या जात आहे बाबत खात्रीशिर बातमी मिळाली. त्याप्रमाणे सदर ठिकाणी बनावट ग्राहक कारवाई पोलीस अधीक्षक,राकेश ओला अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली डि वाय एस पी शिरीष वमने , सपोनि कैलास वाघ, इरफान शेख, अशोक शिंदे, असीर सय्यद श्याम जाधव,संगीता नागरे निलेश सातपुते चालक ज्ञानेश्वर गांगुर्डे शिवाजी नर्हे यांनी कारवाईत भाग घेतला आहे.

# विश्वस्त मंडळाविरोधातील ठराव एकमताने मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**पिंपळगाव काळे :** 12 फेब्रुवारी रोजी पिंपळगाव काळे येथील ग्रामपंचायत कार्यालयातील सभागृहात पार पडलेल्या विशेष ग्रामसभेमध्ये श्रीराम मंदिर संस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या विरोधातील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

पिंपळगाव काळे येथे पुरातन श्रीराम मंदिर संस्थान असून त्याचा सर्व कारभार विश्वस्त मंडळ पाहत आहे. संस्थांनकडे शंभर एकर जमीन असून त्यातून दरवर्षी लाखोंची उत्पन्न विश्वस्त मंडळाकडे जमा होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत असूनही मंदिराची आज रोजी दयनीय अवस्था आहे. कुठल्याच प्रकारचे धार्मिक कार्यक्रम किंवा कुठल्याच प्रकारचे अन्नदान त्या ठिकाणी केल्या जात नाही.त्यामळे गावलोकांच्या मनात याबाबतीत संताप व्यक्त केल्या जात आहे. विश्वस्त मंडळाने चालवलेल्या मनमानी कारभाराविरोधात गावकरी संतप्त झाले होते एक धार्मिक स्थळ असूनही त्या ठिकाणी कुठल्याच प्रकारची मानवीय सेवा केल्या जात नव्हती.त्यासाठी ग्रामस्थांनी श्रीराम मंदिराच्या विश्वस्थ मंडळा विरोधात तक्रार ग्रामपंचायत कडे दिल्या होत्या. त्या अनुषंगाने ग्रामपंचायत ने पिंपळगाव काळे येथे १२ फेब्रुवारी २०२४ रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन केले होते. या विशेष ग्रामसभेमध्ये, मंदिरामध्ये धार्मिक परंपरेनुसार धार्मिक उत्सव साजरे करत नाहीत, मंदिरामध्ये साधुसंतांचा आदर व मुक्काम करू देत नाही, मंदिरामध्ये शुद्धता व स्वच्छता आणि पवित्रता ठेवल्या नाही. मंदिराची असलेली मालमत्ता नासधूस केली आहे.मंदिरामध्ये भंडारा व अन्नदान करत नाही. गावकऱ्यांना व राम भक्तांना मंदिरामध्ये पूजा पाठ करण्यासाठी येऊ दिले जात नाही. मंदिराची सेवा पूजा आरती करीत असलेले पुजारी यांचे परिवार श्रीराम प्रभूच्या डोक्यावरती असलेल्या छतावर वास्तव्य करीत आहे. मंदिराचे गेट 24 तास बंद ठेवल्या जाते. पुरातन असलेल्या हनुमान मुर्त्या व इतर मुर्त्या मंदिरातून गहाळ झाल्या आहेत. क्रीडा संकुल व्यायाम शाळेला दोन एकर जमीन दान देऊन मंदिराचे नुकसान झाले आहे. मंदिराच्या जमिनीचा दरवर्षीप्रमाणे घेतलेल्या डोक्याच्या रुपयाची अफरातफर केली आहे. मंदिराच्या जमिनीचाही वापर केल्या जात आहे. मंदिराचा वापर अवैध धंद्यासाठी केल्या जात असून, मंदिरामध्ये अवैद्य रेतीची साठवणूक करून जास्त भावानी रेती विकल्या जात आहे. या मुद्द्यांवर ग्रामसभेमध्ये चर्चा करण्यात आली व चर्चेअंती ग्रामस्थांनी श्रीराम मंदिर संस्थांनचे कार्यकारणी मंडळ बरखास्त करण्यात यावे असा मुद्दा उपस्थित करण्यात आला व त्यावर सचिवांनी आपले कायदेशीर मत नोंदवत हा विषय धर्मदाय आयुक्त यांच्या अधिकारातील असून त्यांच्याकडे दाद मागण्यात यावी असे ठरले. सरपंच शेख हारून शेख युनुस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या विशेष ग्रामसभेमध्ये सचिव ढगे साहेब यांचेसह मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ व रामभक्त हजर होते.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात शेतकरी नेते प्रसेनजीत पाटील आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** २२ जुलै रोजी जळगाव जामोद आणि संग्रामपुर तालुक्यात झालेल्या महापुरा मध्ये शेतकर्याच अतोनात नुकसान झाले. हजारो हेक्टर जमीन खरडून गेली, पिकांच नुकसान झाल. अश्या परिस्थितीत हवालदिल झालेल्या शेतकर्यांना शासन/ प्रशासना मदत मिळवून देण्यासंदर्भात प्रचंड आशा होत्या. परंतु नुकसान झाल्यानंतर तब्बल जवळपास 8 महिन्यांनी नुकसानीच्या याद्या जाहीर झाल्या. त्यामध्ये ज्यांच खरोखर नुकसान झाल, जमिनी खरडून गेल्या त्यांना मदतीपासून वंचित ठेवण्याचा प्रकार उघडकीस आला. त्यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसने प्रसेनजीत पाटिल यांच्या नेतृत्वात तसेच विविध पक्ष संघटना यांनी आंदोलने केली. त्यानंतर 8 दिवस आधी तहसील कार्यालयाने 1 नोटीस काढून तक्रारकर्त्या शेतकऱ्यांसाठी 15/2/2024 पासून महसूल मंडळ नुसार तक्रारी निवरण्यासाठी कॅम्पचे आयोयन केले. आज 15 फेब्रुवारी ला वडशिंगी महसूल मंडळाला बोलावलेलं असतांना तहसीलदार यांच्यासह सर्व



कर्मचारी गायब होते, शेकडो शेतकरी आले असतांना अधिकारी नसल्यामुळे शेतकरी प्रचंड आक्रोशात होते. अश्या परिस्थितीत शासन/प्रशासनाचा निषेध करीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पार्टीचे नेते प्रसेनजीत पाटिल यांनी तहसील कार्यालयाला कुलुप ठोकले. यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस तालुकाध्यक्ष अविनाश उमरकर, वंचितचे सुनिल बोदडे, सुहास वाघ, अरुण निंबोळकर, आशिष वायझोडे, राजेश वाघ यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# पथकाकडून मृदा आरोग्य पत्रिकाची तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील खांडी पिंपळगाव, वढोद (खु.), निर्गुडी, चिंचोली आदी गावांमध्ये भारतीय मृदा एव भू- उपयोग सर्वेक्षण, कृषि एव किसान कल्याण विभाग, कृषि एव किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार नागपूर, भारत सरकार नागपूर यांच्या पथकाकडून मृदा आरोग्य पत्रिकाची तपासणी करण्यात आली. पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधत मृदा आरोग्याविषयी विविध प्रश्न विचारत मृदा आरोग्य पत्रिकेचे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ होतो का ? याबद्दल माहिती घेतली,संबंधित योजनेविषयी शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत मिळणारे मार्गदर्शन व माहिती संबंधित शेतकऱ्यांना सांगण्यात आली व जमिनीचे आरोग्य तसेच मृदा स्वास्थ कार्ड योजनेचे फायदे आणि वैशिष्ट्ये व माती परीक्षण करून व खते टाकावी असे सांगितले तसेच शेतकऱ्यांचे अपूर्वा सॉफ्टवेअर वर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने आवाज ध्वनीमुद्रित करत ऑनलाईन जमा करण्यात आले. दरम्यान यावेळीअरुण ठाकरे (क्षेत्र अधिकारी) डॉ. आश्विन चेके (सहाय्यक क्षेत्र अधिकारी) यांच्यासह मंडळ कृषी अधिकारी के. एन. इंगळे, कृषी पर्यवेक्षक पी. व्ही. घाईट, संजय धबाले, कृषी सहायक सचिन सरगर, श्रीकृष्ण, नागरे, अरविंद पवार, प्रियंका राठोड आदींची उपस्थिती होती.



# हमी भावाऐवजी लाठीहल्ला; हेच भाजपचे शेतकरी प्रेम

## उद्धव ठाकरे : डॉ. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे दर देणे गरजेचे

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शेतमालाच्या किमान हमी भावाला कायद्याची गॅरंटी मिळावी,यासारख्या विविध मागण्यांसाठी शेतकरी आणि शेतकरी संघटना आंदोलन करत आहेत.या शेतकरी आंदोलनाला पंजाब-हरियानाच्या शंभू सीमेवर मंगळवार दि.१३ फेब्रुवारी हिंसक वळण लागले. शेतकरी संघटना आणि शेतकऱ्यांनी दिल्लीमध्ये दाखल होण्यापूर्वी सरकारने त्यांना डॉ.स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे दर देणे गरजेचे असतांना पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न करून त्यांच्यावर अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या हेच का तुमचे शेतकरी प्रेम; "जय जवान,जय किसान" म्हणत भाजपने शेतकऱ्यांवर केलेला हल्ला शेतकरी कधीही विसरणार नाही, असे प्रतिपादन शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नुकतेच कोपरगाव येथे बोलताना केले आहे. उद्धव ठाकरे यांचा काल पासून अ.नगर जिल्हा दौरा सुरू झाला होता.आज दौऱ्याचा दुसरा व शेवटचा दिवस होता त्याची सुरुवात कोपरगाव पासून सकाळी साडे दहा वाजता करण्यात आला आहे.प्रारंभी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यांना हार अर्पण करून तालुक्यातील जनतेशी डॉ.आंबेडकर यांच्या मैदानावर 'संवाद मेळावा' आयोजित करण्यात आला होता.



त्यावेळी ते बोलत होते. सदर प्रसंगी यावेळी शिवसेनेचे प्रवक्ते खासदार संजय राऊत,शिर्डीचे माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे,विधान परिषदेतील विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे,सेनेचे उत्तर नगर जिल्हा प्रमुख रावसाहेब खेवरे,माजी जिल्हाप्रमुख राजेंद्र झावरे,माजी नगराध्यक्ष संजय सातभाई,उपजिल्हा प्रमुख कैलास जाधव,तालुका प्रमुख बाळासाहेब रहाणे,शहर प्रमुख सनी वाघ,माजी शहर प्रमुख भरत मोरे,कलविंदर दडियाल,माजी जिल्हा प्रमुख प्रमोद लबडे,माजी तालुका प्रमुख शिवाजी ठाकरे,श्रीरंग चांदगुडे,रावसाहेब टेके आदीसंह मोठ्या संख्येने शिवनसैनिक व नागरिक उपस्थित होते. त्यावेळी पुढे बोलताना म्हणाले की,"स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची मागणी वाईट कशी ठरवतात अशी विचारणा करून ज्यांच्या विरुद्ध तुम्ही काटेरी कुंपण उभे केले व त्यांच्यावर अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या जात आहे.ती याच शेतकऱ्यांची मुले असून त्यांना आपापसात लढवले जात असल्याचा आरोप केला आहे.जे पोलीस बळ सीमेवर शत्रूवर गोळ्या घालायला उभे करायला हवे ते तुम्ही शेतकऱ्यांविरुद्ध उभे करत असून हे पाप तुम्ही कुठे फेडणार आहे ? असा सवाल सत्ताधारी भाजपला केला व हि कुठली लोकशाही आहे.तुम्हाला शेतकरी केवळ मते घेण्यापूरते लागतात असा आरोप केला आहे.तुम्ही आम्हाला मत दिले आता तुमची गरज संपली आता आम्ही आमच्या सुटाबुटातील मित्रांचे खिसे भरणार असे त्यांचे भाजपचे धोरण असल्याचा आरोप केला आहे.निवडणूक आली की,"मेरे प्यारे देशवासीयो"असे आवाहन करायला हे मोकळे.त्यावेळी त्यांनी भारत रत्नाचा बाजार भरला असल्याचा त्यांनी आरोप केला आहे. डॉ.स्वामिनाथन असते व त्यांना हयातीत जर भारतरत्न दिले असते तर आनंद वाटला असता.त्यांच्या हयातीत,"आम्ही त्यांना राष्ट्रपती करा" अशी मागणी आम्ही केली होती असा दावा केला व त्यावेळी त्याकडे भाजपने कानाडोळा केल्याचा आरोप केला आहे.व त्यांच्या निर्वाणानंतर त्यांना,'भारत रत्न' पुरस्कार देऊन त्यांचे अवमूल्यन केले असल्याचा आरोप केला आहे.'भारत रत्न' हि खरी आमची समोर बसलेली जनता असून त्यांचे खरे कौतुक केले पाहिजे असे आवाहन केले आहे. सदर प्रसंगी त्यांनी ज्या डॉ.आंबेडकर यांनी घटना लिहिली आज ती धोक्यात असल्याचा आरोप केला आहे.त्यांना हे समजल्याने आज मुस्लिम समाज आमच्या बरोबर असल्याचा दावा केला आहे.आता अशी वेळ आली आहे की,"आता खरा तिरंगा हाती घेण्याची वेळ आली असनू मागे गावोगाव भाजपचे रथ आले त्यावेळी त्यावर 'भारत सरकार' असे नाव नव्हते तर 'मोदी सरकार' असे नाव होते.तुम्ही आमच्या देशाचे नाव बदलले का ? असा तिरका सवाल भाजपवाल्याना केला आहे.आगामी निवडणुकीत जर त्यांना निवडून दिले तर हे देशाचे नाव व देशाचा ध्वज बदलवतील असा आरोप आहे. भाजपचा फडके (झेंडा) त्यांनी धुणीभांडी करण्यासाठी वापरावे असे आवाहन केले आहे.आमच्या तिरंग्याला हात लावला तर जाळून खाक करू असा इशारा दिला आहे.व येथील उपस्थित नागरिकांचे कौतुक करून आगामी काळात येथे लोकसभा निवडणुकीत शिवसेनेचा वाघच (माजी खा.भाऊसाहेब वाकचौरे ) येतील असे स्पष्ट करून आपल्या भाषणाला विराम देऊन त्यांनी संगमनेरकडे कूच केले आहे. प्रारंभी खा.संजय राऊत त्यांनी उपस्थितांना संबोधित केले असून दोघांनी आपले भाषण आवरते घेतले होते.कार्यक्रमाचे प्रास्तविक माजी तालुका प्रमुख शिवाजी ठाकरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार शहर प्रमुख सनी वाघ यांनी मानले आहे.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत संपृक्तता

## कृषी अधिकारी मदन सिसोदिया

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील व सोयगाव तालुक्यात शेतक-यांना निश्चित



उत्पन्न मिळवून देणाऱ्या केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची संपृक्तता साध्यतेसाठी राज्यात दिनांक ६ डिसेंबर, २०२३ ते १५ जानेवारी, २०२४ या कालावधीत राबविलेल्या मोहिमेत १.०४ लाख शेतकऱ्यांचे ई-केवायसी प्रमाणिकरण, ३.०१ लाख स्वयंनोंदणीकृत शेतक-यांची नव्याने नोंदणी करण्यात आली. तथापि, राज्यातील एकुण १.९४ लाख शेतक-यांनी योजनेच्या लाभासाठी आवश्यक इतर सर्व बाबींची पूर्तता केलेली असून त्यांचे केवळ ई-केवायसी करणे बाकी आहे.त्यांनी तात्काळ करून द्यावे असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी केले आहे. अशा शेतक-यांचे मुख्यतः सामाईक सुविधा केंद्रांमार्फत (CSCS) EKYC प्रमाणिकरण करण्यासाठी दि. १२ फेब्रुवारी ते दि. २१ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत आणखी १० दिवसांची देशव्यापी संपृक्तता मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेची क्षेत्रीयस्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मा. आयुक्त कृषी डॉ. प्रवीण गेडाम यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना निर्देश दिले आहेत. या मोहिमे दरम्यान केवळ EKYC प्रमाणिकरण बाकी असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या नजिकचे सामाईक सुविधा केंद्र व ग्रामस्तरीय नोडल अधिकारी यांचे मार्फत EKYC प्रमाणिकरण पूर्ण करावे. शेतकऱ्यांनी स्वतःचे ई-केवायसी प्रणाणिकरण करण्यासाठी मोबाईलवरील ओटीपी, सामाईक सुविधा केंद्र, पी. एम. किसान फेस ऑथेंटिकेशन ॲप या सुविधांपैकी कोणत्याही एका सुविधेचा वापर करावा,पी. एम. किसान योजने अंतर्गत ई-केवायसी प्रमाणिकर करणे, योजनेसाठी नव्याने नोंदणी करणे, बँक खाती आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता करण्यासाठी शेतकऱ्यांनी समक्ष हजर असणे आवश्यक आहे. बँक खाती आधार संलग्न करणे बाकी असलेल्या शेतक-यांनी आपल्या सोईनुसार प्राधान्याने नजीकचे पोस्ट कार्यालयामध्ये आधार संलग्न खाते उघडावे. केंद्र शासन पी. एम. किसान योजनेचा १६ वा हप्ता माहे फेब्रुवारी, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वितरीत करणार आहे. तसेच पी. एम. किसान योजनेचा लाभ अदा केलेल्या लाभार्थीनाच राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ अदा होईल.

# गोंडवाना विद्यापीठ देणार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक सुधीर मुनगंटीवार यांना डी. लीट. पदवी

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गोंडवाना विद्यापीठात आज अधिसभेची विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. सन्मान्य पदवी प्रदान करण्यासंदर्भात राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्याकडून प्राप्त मान्यता पत्रानुसार दीक्षांत समारंभात सन्मान्य पदवी (D.LIT.) प्रदान करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम ०१६ च्या कलम १२९(१) (२) मधील तरतुदीच्या अनुषंगाने कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांनी विद्यापीठाची सन्मान्य पदवी प्रदान करण्याकरीता दोन नावे कुलपती महोदयांकडे प्रस्तावित केलेली होती. त्यानुसार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस आणि वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार या दोन नावास मान्यता प्रदान केलेली आहे.महाराष्ट्र





सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १२९(१) नुसार कुलगुरु महोदयांनी कुलपती महोदयांची मान्यता मिळविली असेल अशा स्थितीत, कोणत्याही व्यक्तीस, कोणतीही चाचणी परीक्षा किंवा परीक्षा किंवा मूल्यमापन परीक्षा देण्यास भाग न पाडता, केवळ तिचेश्रेष्ट स्थान, नैपुण्य व सार्वजनिक सेवा यामुळे सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक इतर विशेषोपाधी मिळण्यास ती पात्र व योग्य आहे, केवळ याच कारणांवरुन त्या व्यक्तीला अशी सन्मान्य पदवी किंवा विद्याविषयक ईतर विशेषोपाधी प्रदान करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेला विचार करता येईल व अधिसभेला शिफारस करता येईल अशी तरतुद आहे. त्यानुसार दि. ०४ डिसेंबर, २०२३ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत सदर दोन नावाची शिफारस अधिसभेला करण्यात आली . करीता व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार सदरहु दोन व्यक्तीस विद्यापीठाची सन्मान्य पदवी (D.LIT.) बहाल करण्यास्तव यथोचितरित्या संमती मिळण्याकरीता अधिसभेपुढे बाब ठेवण्यात आली. सदर बाबीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्यामुळे गोंडवाना विद्यापीठाच्या ११व्या दीक्षांत समारंभात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना डी. लीट पदवीने सन्मानित करण्यात येणार आहे. ही अधिसभा कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

# संत सेवालाल महाराजांचा आदर्श घ्यावा : प्राचार्य कोलते

आधुनिक केसरी न्यूज


**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील आज दिनांक 15 फेब्रुवारी जय कालंका देवी शिक्षण संस्था संचलित कै लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय व छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसुर्य अखंड भारतातील गौर बंजारा समाजाचे आराध्य दैवत कुशल नेतृत्व व प्रेरणास्थान संत श्री सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व आनंदात साजरी करण्यात आली यावेळी संस्थेचे अध्यक्ष भावराव कोलते पा कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर प्राचार्य नारायण कोलते यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले तसेच मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन होऊन अभिवादन करण्यात आले संत सेवालाल महाराज यांच्या जीवनावरती प्रकाश टाकताना प्राचार्य नारायण कोलते यांनी विद्यार्थ्यांना संत सेवालाल महाराज यांच्या जीवनाचा परिचय सांगितला.तसेच अनिष्ट रूढी आणि शोषणाविरुद्ध वाणीतून सामाजिक सुधारणा करण्यासाठी प्रहार केला. त्यांची जयंती महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यात शासन स्तरावर साजरी केली जाते. बंजारा समाजाचे महान तपस्याचे दैवत संत सेवालाल महाराज हे अन्नपद भटक्या जातीचे मार्गदर्शक, समाजसुधारक व क्रांतिकारक भगवंत होते.संत सेवालाल महाराज बंजारा समाजाचे कुलदैवत संत सेवालाल महाराज एक महापुरुष आणि पराक्रमी महात्मा होते. हे महान संत आणि थोर समाज सुधारक होते. बंजारा समाजाचे संत सेवालाल महाराज, दिल्लीचे नवाब गुलाब खान यांची गुलामगिरी स्वीकारली नाही. दिल्ली नवाबाचा पराभव करून सेवालाल महाराजांनी दिल्लीचे राज्य जिंकले. सेवालाल संत सेवालाल महाराजांनी स्वतःच्या बंजारा बोलीत उपदेश केला.अठराव्या शतकात बंजारा समाजाच्या लोकांना काम मिळत नव्हते. अशाप्रकारे संत सेवालाल महाराज यांनी आपला जीवनामध्ये शिक्षणाचे महत्त्व व शिक्षण आयुष्यात काय अमलाग्र बदल घडू शकतो यासाठी शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे हे विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते पिल्यावर मनुष्य हा गुरगुरल्याशिवाय राहत नाही याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे संत सेवालाल महाराज हे होय अशी सविस्तर माहिती दिली उपस्थित सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी महाराजांच्या प्रतिमेस फुले वाहून त्यांना अभिवादन केले यावेळेस संस्थेतील सर्व पदाधिकारी व शाळेतील सर्व शिक्षक सर्व विद्यार्थी व शिक्षक पालक यांना केले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक विकास पाटील विजय सिंग राजपूत भास्कर ससाणे संजय जोशी भास्कर खमाट मुकुंद व्यवहारे सुदाम राठोड ज्ञानेश्वर राठोड पोपटराव सोनवणे भूषण देसले जीवन कोलते शाम जाधव अजबराव चव्हाण बाबासाहेब कोलते राहुल बडक गणेश मोहने गणेश सत्रे, जयराम घोती, सतीश खवले पंजाबराव शेळके योगेश थोटे सतीश गावंडे जयराम घोती मनोहर पडोळ संजय अमृतकर,शिवाजी सत्रे इत्यादी प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते तर सर्व विद्यार्थी व पालक तो पत्रकार बंधू गोकुळ सिंग राजपूत रहीम पठाण सुनील चोरमले जब्बार तडवी सर्व पालकांचे शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे आभार प्रा जीवन कोलते पा.यांनी मानले.



# सराफांना दणका; बंगाली कारागिराने दीड किलो सोने लांबवले

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** येथील सराफ व्यावसायिकांचे सुमारे पाऊण कोटी रुपये किंमतीचे दीड किलो सोने घेऊन बंगाली कारागीराने अन्य साथीदारांसह गुरुवारी पलायन केले. काशिनाथ बंगाली असे त्याचे नाव आहे. या घटनेने सराफ बाजारात खळबळ उडाली आहे.



काशिनाथ बंगाली हा सोने कारागीर गेली पंधरा वर्षे गुजरी परिसरातील महादेव गल्लीत राहत होता. कोल्हापुरातील अनेक सराफ पेढ्यांचे दागिने बनवण्याचे तो काम करत होता. त्याच्याकडे जवळपास आठ ते दहा कामगार काम करत होते. आज सकाळी आपल्या आठ ते दहा साथीदारांसह त्याने कोल्हापुरातून पोबारा केला. याची माहिती मिळताच त्याच्याकडे दागिने करण्यासाठी सोने दिलेल्या सराफांनी महादेव गल्ली परिसरात गर्दी केली होती. घटनास्थळावरून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार स्वप्निल भुरके यांचे ९३ ग्रॅम, राघवेंद्र रेवणकर यांचे ६०० ग्रॅम, तर चिपडे सराफ यांचे २५० ग्रॅम सोने घेऊन काशिनाथ बंगाली या परप्रांतीय कारागिराने पोबारा केला. फसवणुकीचा आकडा वाढण्याची शक्यता असून जुना राजवाडा आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. त्यांच्याकडून फसवणूक झालेल्या सराफ व्यवसायिकांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे.


# जळ पिंपळगाव बहुप्रतिक्षित पुलाचा मार्ग मोकळा

## खा. जाधव, आ. डॉ. खेडेकर यांच्या प्रयत्नाला यश

आधुनिक केसरी न्यूज







**देऊळगाव राजा :** दे.राजा व सि.राजा या दोन्ही तालुक्यातील गावांना जोडण्यासाठी आमना नदी आडवी आहे आणि या नदीवर दळणवळणासाठी पूल पूल उभारण्यात यावा अशी मागणी स्वातंत्र्य काळापासून सुरू आहे त्याचे कारण ही तसे आहे जून महिन्यापासून ते डिसेंबर महिन्यापर्यंत या नदीला सतत पाणी वाहत असते देऊळगाव राजा तालुक्यातील पिंपळगाव येथे सिंदखेड राजा तालुक्यातील मुले शिक्षणासाठी ये जा करीत असतात या नदीपात्रातून भरपूर पाणी असल्यामुळे दररोज जीव घेणे प्रवास विद्यार्थ्यांना व नागरिकांना करावा लागतो त्यामुळे शासन दरबारी अनेक वेळा प्रश्न निर्माण करून आजपर्यंत तो प्रश्न मार्गी लागला नाही याच बरोबर देऊळगाव राजा तालुक्यातील निमगाव गुरू व नारायण खेड येथे देखील अशीच परिस्थिती आहे त्यामुळे हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा अशी आग्रही मागणी खासदार प्रतापराव जाधव व मा.आ. डॉ.शशिकांत खेडेकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कडे केली होती. अखेर सदर पुलासाठी 9 कोटी 15 लाख रुपये निधी मंजूर झाला असून शेकडो वर्षाचा प्रतीक्षेत असलेल्या जळगाव पिंपळगाव येथील पुलाच्या मार्ग अखेर मार्गी लागला आहे. यासंदर्भात 14 नोव्हेंबर रोजी डॉ. शशिकांत खेडेकर यांनी नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची त्याच्या राहत्या घरी भेट घेऊन सदर प्रश्न तात्काळ मार्गी लावावा अशी मागणी केली होती कारण

पुला अभावी विद्यार्थी व नागरिक वाहून गेल्याच्या घटना खूप प्रमाणात झालेले आहे नदीच्या दोन्ही बाजूंनी दोन्ही गावातील शेती असल्यामुळे शेतकरी मजूर महिला व पुरुष यांना याच नदीतून जावे लागते तसेच नदीवर पूल नसल्यामुळे दवाखान्यात व शाळांमध्ये नदीपात्रातूनच जावे लागते अचानक नदीला पूर आल्यामुळे जनावरे वाहून गेल्याची घटना खूप वेळा घडलेली आहे या पुलासाठी तात्काळ निधी मंजूर करण्याची मागणी डॉ. शशिकांत खेडेकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. खासदार प्रतापराव जाधव यांच्या अथक प्रयत्नाने व मा.आ.डॉ.शशिकांत खेडेकर यांच्या पाठपुराव्यामुळे सदर मागणी मंजूर केल्याबद्दल ना.नितीन गडकरी यांचे आभार गावकऱ्यांनी मानले आहे.

**भाजपच्याअनेक मान्यवरांनी या गावाला दिली आहे भेट :** भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेपासून एकनिष्ठ व भारतीय जनता पक्षावर या परिसरातील लोक मोठ्या प्रमाणात प्रेम करणारी असल्याने या ठिकाणी तीन वेळा उपमुख्यमंत्री स्वगोपीनाथ मुंडे साहेब दोन वेळा केंद्रीय मंत्री स्वप्रमोद महाजन व एक वेळा सर संघचालक मोहन भागवत यांनी या गावात भेट दिली असल्याची आठवण यावेळी डॉक्टर शशिकांत खेडेकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना करून दिली होती .

# मुख्यमंत्र्यांना कोल्हापुरात काळे झेंडे दाखवणार

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे ठरल्याप्रमाणे गतवर्षीचे १०० रूपये थकीत बील तातडीने देणे संदर्भात शासनाने पावले उचलावीत. अन्यथा मुख्यमंत्र्याचे कोल्हापुरात १६ फेब्रुवारी रोजी काळे झेंडे दाखवून स्वागत करू, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी बुधवारी दिला. ऊस बिलासाठी २३ नोव्हेंबर २०२३ रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शिरोली पुलावर चक्का जाम केले. गतवर्षी तुटलेल्या उसाचे थकीत बील १०० रूपये द्यावेत, तसेच ज्या साखर कारखान्यांनी ३००० च्या वर दिला आहे, त्यांनी ५० रूपये द्यावेत, असा लेखी प्रस्ताव दिल्यानंतर आंदोलन मागे घेतले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मध्यस्थी करून साखर कारखाने पैसे देतील असे आश्वासन दिले होते. दोन महिने होत आले तरीही अद्याप अनेकांनी प्रस्ताव दाखल केला नाही. केवळ ८ साखर कारखान्यांनी साखर आयुक्तांकडे प्रस्ताव सादर केला आहे. तसेच काही साखर कारखान्यांनी बिले देत नाही सांगत नकाराची घंटा पसरवलेली आहे. मुख्यमंत्र्यांचा शब्द आम्ही मान्य करून आंदोलन स्थगित केले होते. मुख्यमंत्र्यांनी शब्द देऊन देखील कारखानदार बीले देता येत नाही असे सांगत असतील तर मुख्यमंत्र्यांचा शब्द हा उपमर्द आहे. मुख्यमंत्र्यांना मागणी करून देखील या संदर्भात शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे मिळत नाहीत. दोन दिवसात शेतकऱ्यांचे पैसे द्यावेत अन्यथा मुख्यमंत्र्यांचे काळे झेंडे दाखवून स्वागत करू, असा इशारा त्यांनी दिला.



# मराठा समन्वय परिषदेच्या हळदी-कुंकू कार्यक्रमात रंगला संस्कृतीचा सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** मराठा समन्वय परिषदेच्या हळदी-कुंकू कार्यक्रमात सांस्कृतिक व संस्कृतीचा सोहळा रंगला होता. पारंपारिक वेशभूषेत आलेल्या महिलांनी विविध स्पर्धेत सहभाग नोंदवला. कार्यक्रमात निरोगी आरोग्याचा जागर करुन महिलांना आरोग्याचे वाण देण्यात आले. तर यावेळी पारंपारिक मराठी गीतांवर संगीत मैफल रंगली होती.

सावेडी येथील गावडे मळा परिसरात झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. संगिता कांडेकर, नगरसेविका दिपाली बारस्कर, मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे, प्रयास ग्रुपच्या अध्यक्षा अलकाताई मुंदडा, विद्या बडवे, कमल खेडकर, मनिषा सोनवणे, सविता गांधी, उषा सोनटक्के, मंजुषा सावदेकर, कांता विधाते, प्रतिभा जोशी, संगीता खेडकर, मनीषा वाघ, मिनाक्षी जाधव, दिप्ती मुंदडा, उषा सोनी, लीलावती अग्रवाल, साधना भळगट, प्रतिभा भिसे, इंदूताई गोडसे, हिरा शहापुरे, सुरेखा वाघ, शितल आवारे, जयश्री पुरोहित, निलिमा पवार, राखी जाधव, मनिषा चव्हाण, मिनाक्षी मुनफन, स्वरा मुनफन, ज्योती बेल्हे, योगिता वाघमारे, दीपा गुंड, सोहनी पुरनाळे, औटी आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात अनिता काळे म्हणाल्या की, महिलांच्या सक्षमीकरणासाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मराठा समन्वय परिषदेच्या माध्यमातून विविध उपक्रम घेण्यात येत आहे. मराठा समन्वय परिषदेच्या माध्यमातून महिला वर्ग मोठ्या संख्येने जोडले गेले असून, त्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी कार्य सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. संगिता कांडेकर म्हणाल्या की, सर्व महिलांना एकत्र आणणारा हा उत्सव आहे. सर्व महिला एकमेकिंना विचारांची देवाण-घेवाण करत असतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना निरोगी आरोग्याबद्दल करण्यात आलेली जागृतीचा उपक्रम दिशादर्शक असल्याचे ते म्हणाल्या. दिपाली बारस्कर यांनी हळदी-कुंकू कार्यक्रम संस्कृती जोपासण्याचा सोहळा आहे. या सोहळ्याचे महिला वर्ग आतुरतेने वाट पाहत असतात. या कार्यक्रमात एकमेकींसह ऋणानुबंध जोडले जात असल्याचे त्यांनी सांगितले. हळदी-कुंकूच्या सेल्फीपॉइंटने सर्व महिलांचे लक्ष वेधले. तर महिलांनी सेल्फी पॉइंटवर फोटो घेण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी महिलांसाठी विविध मनोरंजन, कौशल्यात्मक व बौध्दिक स्पर्धा रंगल्या होत्या. स्पर्धेत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विजेत्या महिलांना उपस्थितांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारिका कासट यांनी केले. आभार विद्या बडवे यांनी मानले.

# सोयगाव तालुक्यात नव्या रस्त्यांना मंजुरी मागचे कामे प्रलंबित; जि.प.सदस्य जाधव

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात राज्य सरकारने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतून (मग्रारोहयो) सोयगाव पंचायत समितीमार्फत राबविल्या जाणाऱ्या या योजनेअंतर्गत तालुक्यात आधीची कामे पूर्ण झालेली नसतानाही नव्या रस्त्यांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे.अशी माहिती जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना दिली. सोयगाव तालुक्यात आतापर्यंत सुमारे बरेच पाणंद रस्ते मंजूर करण्यात आले असून, त्यापैकी बरेच पाणंद रस्त्यांची कामे सुरू आहेत. उर्वरित बरेच कामांना अद्याप सुरुवात झालेली नाही. आपल्या भागातील, गावातली पाणंद रस्त्यांची कामे व्हावीत यासाठी गावोगावचे नागरिक, पंचायत समितीच्या 'मग्रारोहयो' कक्षातील अधिकारी- कर्मचाऱ्यांकडे चकरा मारत आहेत. मात्र, अद्यापही त्यांना प्रशासकीय मान्यता आणि कार्यारंभ आदेश मिळत नाही. सोयगाव तालुक्यात ठिकठिकाणी मंजूर झालेल्या कामांना अद्यापही वेग आलेला नाही. अधिकारी आणि कर्मचारी यांना केवळ कामे मंजुरीतच रस असल्याचे दिसून येत आहे. त्यातच सरकारने २५ जानेवारी २०२४ रोजी नवीन यादी प्रसिद्ध केली असून, त्यात सोयगाव तालुक्यासाठी आणखी सुमारे बरेच पाणंद रस्त्यांच्या कामांना मंजुरी दिली आहे. आधीच मंजुरी मिळालेली कामे अद्यापही पूर्ण झालेली नसताना, आणखी नवीन कामांना मंजुरी देऊन, शासन केवळ ठेकेदारांचे हित जोपासत आहे, अशी टीका जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी केली आहे. गावांच्या विकासासाठी असलेल्या या योजनेतून गावांचा विकास होण्याऐवजी ठेकेदारांचाच विकास होत आहे, अशी तालुक्यात चर्चा होत आहे.

# रथसप्तमीनिमित्त विद्यालय- महाविद्यालयात पतंजलीतर्फे सूर्यनमस्काराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** रथसप्तमी सूर्याच्या जन्माचे प्रतीक असून या दिवशी सूर्य जयंतीच्या स्वरूपात रथसप्तमी साजरी केली जाते. शुक्रवार 16 फेब्रुवारी रोजी पतंजली योग परिवारातर्फे विद्यालय, महाविद्याल, वस्तीग्रह ठिकाणी योग शिक्षकाद्वारे सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात येत आहे. सूर्यनमस्कार सहसा बारा स्टेप्स मध्ये काढले जातो. सात योगासनाचा समावेश असून पाच आसने रिपीट होतात. त्या असण्याची नावे प्रणामासम, हस्त उत्तानासन, हस्त पादासन, अश्वसंचलनासन, पर्वतासन, अष्टांगासन, भुजंगासन मग रिपीट होतात पर्वतासन, अश्वसंचलनासन, हस्त पादासन, हस्त उत्तानासन व प्रणामासम. बारा आसने करताना प्रत्येक आसनासोबत सूर्याची उपासना सूर्याची विविध नावे घेऊन केली जाते, जसे ओम मित्राय नमः, ओम रवये नमः, ओम सूर्याय नमः, ओम भानवे नमः, ओम खगय नमः, ओम पुष्णेय नमः, ओम हिरण्यगर्भाय नमः, ओम मरीचय नमः, ओम आदित्याय नमः, ओम सवित्रेय नमः, ओम अर्काय नमः, ओम भास्कराय नमः जिल्हा तिल सर्व योग शिक्षक योगसाधक व पतंजली परिवारातील कार्यकर्त्यांना आपल्या परिसरातील शाळा, विद्यालय, महाविद्यालय व वसतिगृह जाऊन सूर्यनमस्काराचे आयोजन करावे असे जिल्हा समिती आव्हान करत आहे. सूर्यनमस्काराने सर्व अवयवांना सर्वांगीण व्यायाम मिळतो. मुलांना हे गरजेचे आहे. ही काळाची गरज आहे.

# ॲड. आढाव यांच्या नव्या पुस्तकाची प्रतीक्षा; 'प्रेमाच्या काठावर'चे मुखपृष्ठ प्रकाशित

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** "गरज सायकलची" या पुस्तकाचे लेखक व युवा साहित्यिक ॲड आकाश शिवाजी आढाव यांचे नवे पुस्तक वाचकांच्या भेटीला येत आहे. व्हॅलेंटाईनच्या दिवशी त्यांनी "प्रेमाच्या काठावर" या पुस्तकाचे मुखपृष्ठ प्रकाशित केलेले असून या मुखपृष्ठाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य आणि महाराष्ट्र साहित्य परिषद सातारा जिल्हा प्रतिनिधी रविंद्र बेडकिहाळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले.हे पुस्तक एक कादंबरी असून हे पुस्तक हातात पडण्यासाठी आता आपल्या सर्वांनाच काही दिवसांची प्रतिक्षा करावी लागणार आहे.असे आकाश आढाव यांनी म्हटले आहे.आकाश आढाव हे फलटणचे रहिवासी असून गेली अनेक वर्षा पासून ते विविध विषयांवर लिखाण करत असतात.आपले विचार मांडत असतात. नुकतेच त्यांनी वकिली क्षेत्रात पदार्पण केले आहे.वकिली क्षेत्र बघत बघत त्यांनी साहित्य क्षेत्रात सुध्दा लेखन कार्य सुरू ठेवले



आहे.आकाश आढाव यांच्या नव्या पुस्तकाबद्दल रविंद्र बेडकिहाळ यांच्या सह अनेकांनी शुभेच्छा दिलेल्या आहेत.हे मुखपृष्ठ त्यांच्या लिखाणाचा आशय सांगणारे आहे असे रविंद्र बेडकिहाळ यांनी म्हटले.

युवा साहित्यिक आकाश आढाव यांच्या पाठीशी माझे आशीर्वाद आणि मार्गदर्शन नेहमीचं राहील. ही साहित्यकृती वाचकांवर प्रभाव पाडणारी ठरेल आणि त्यासाठी माझ्या अगणित शुभेच्छा आहेतच असे सुद्धा त्यांनी म्हटले.या पुस्तकाचे मुखपृष्ठ चित्र आणि त्यावरील सुलेखन अभिनव कला महाविद्यालय पुणे येथील विद्यार्थिनी युवा चित्रकार शुभांगी आटोळे यांनी बनविलेले आहे. मला या कादंबरीचे मुखपृष्ठ बनवण्याची संधी मिळणं हे मी माझ्या यशस्वी जीवनाकडे पडलेलं पहिलं पाऊल समजते ही कादंबरी प्रगतीपथाची सिडी ठरेल.असे शुभांगी आटोळे यांनी म्हटलेले आहे. साहित्यिक समीक्षक सचिन गोसावी म्हणाले की,आकाभाऊ खुप खुप पुढे जा आणि यशस्वी व्हा.तुमचं भविष्य खुप उज्वल आहे. तुमच्या महाराष्ट्रभर उत्सुकता असलेल्या पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याची मला संधी मिळाली,मी स्वतःला खुप नशिबवान समजतो.राजेंद्र भागवत म्हणाले की,आकाश सर आपले मनापासून अभिनंदन आपल्या साहित्यातून नवसमाज घडण्यासाठी निश्चित मदत होईल.मनोज अनपट म्हणाले की,तुमच्या कार्याला आमचा सलाम,फार कमी वयात येवढं मोठं काम,त्यासाठी खूप मोठं शब्द भांडार लागतं,अनुभवाचा कस लागतो,खरच मानलं तुम्हाला.,वाट बगील तुमच्या कादंबरीची..लेखिका प्रतिक्षा कांबळे-आढाव म्हणाल्या की,वास्तव दर्शवणारी,आणि प्रेमाची नवी परिभाषा दाखवणारी कादंबरी म्हणजे प्रेमाच्या काठावर..यासारख्या अनेक लोकांच्या प्रतिक्रिया आकाश आढाव यांच्या नव्या पुस्तकासाठी आलेल्या आहेत.पुस्तकाचे लेखक व युवा साहित्यिक ॲड.आकाश आढाव म्हणाले की,प्रेम या विषयाला अनुसरून आणि हा धागा पकडून समाजातील विविध घटकांचं चित्रण करून या कादंबरीतील जवळपास प्रत्येक प्रसंगातून एक प्रेमाचा अनुभवाचा आणि सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. भाषाशैली अतिशय साधी सोपी असून काही ठिकाणी त्यावर आक्षेप येतील असेही धाडसाने वास्तविक लिखाण केलेले आहे.विशेषतः तरुण वर्गाने वाचनाकडे वळावे हा सुद्धा प्रामाणिक हेतू आहे.असे सुद्धा त्यांनी म्हटले आहे.त्यामुळे येणाऱ्या काळात हे पुस्तक हाती पडण्यासाठी प्रतिक्षा करावी लागणार असली तरी हे पुस्तक जाणून घेण्यासाठी अनेकजण उत्सुक असल्याचे दिसून येत आहे.

# गडचिरोलीत पाच दिवस महासंस्कृती महोत्सव आजपासून

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** महासंस्कृती महोत्सवांतर्गत गडचिरोलीकरांसाठी पाच दिवस भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यासाठी नागरिकांना यात सहभागी करून घेण्यासाठी कार्यक्रमाचे व्यापक प्रसिद्धी करण्याच्या सूचना अतिरिक्त जिल्हाधिकारी धनाजी पाटील यांनी आज दिल्या.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि गडचिरोली जिल्हा प्रशासनाच्यावतीने महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन १६ फेब्रुवारी २०२४ ते २० फेब्रुवारी २०२४ पर्यत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पटांगणात करण्यात आले आहे. यासाठी करण्यात येत असलेल्या तयारीचा आढावा पाटील यांनी आज घेतला. यावेळी उपविभागीय अधिकारी, कुरखेडा, विवेक सांळुके तसेच विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वने सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, तर प्रमुख उपस्थितीमध्ये अन्न व औषधी प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, खासदार अशोक नेते, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, आमदार सर्वश्री सुधाकर अडबाले, रामदास आंबटकर, डॉ. अभिजीत वंजारी, डॉ. देवराव होळी, कृष्णा गजबे यांची उपस्थिती राहणार आहे. महासंस्कृती महोत्सवात शुक्रवार १६ फेब्रुवारी २०२४ रोजी नक्षत्रांचे देणे हा सुधीर फडके आणि आशा भोसले यांच्या मराठी हिंदी गाण्यांचा कार्यक्रम सारेगम विनर प्लेबैक सिंगर ऋषिकेश रानडे व फिल्मफेयर अवार्ड विजेत्या गायीका आनंदी जोशी सादर करणार आहेत. १७ फेब्रुवारी रोजी जागर लोक कलेचा, दंडार, गोंधळ, रेला नृत्याचे सादरीकरण झाडीपट्टी ग्रुपचे हरीश चंद्रा बोरकर तर मेघा घाडगे व सहकलाकार लावणी सादर करणार आहेत. १८ फेब्रुवारी रोजी बिरसा मुंडा यांची जीवनगाथा या महानाट्याचे सादरीकरण होईल. १९ फेब्रुवारी रोजी समीर चौगुले आणि सहकाऱ्यासंकडून हास्य जत्रा कार्यक्रमाचे तर मंगळवार २० फेब्रुवारी रोजी कूवारा भिवसेन यांच्या जीवनावर आधारित झाडीपट्टी महानाटकाचे सादरीकरण होणार आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे

# वाढदिवसाचा खर्च टाळून पुस्तकांचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज



**सोनई :** शाहू, फुले, आंबेडकर, चलवळीचे सामाजिक कार्यकर्ते विजय जगताप यांच्या वाढदिवसाच्या निमित्तने होणाऱ्या खर्चला फाटा देत त्यांनी समजातील हुशार शालेय गोरगरीब, गरजू, विद्यार्थी व विद्यार्थिनी शालेय वस्तुचे नुकतेच वाटप करण्यात आले. पत्रकार विजय खंडागळे यांच्या हस्ते 1ली ते 7वी च्या 70 विद्यार्थी यांना वही, पेन, शालेय साहित्य, व खाऊंचे असे साहित्य वाटप करण्यात आले. जगताप म्हणाले, समजातील हुशार विद्यार्थीना गरजू वस्तुची भेट देऊन चागले शिक्षणघेण्यासाठी प्रोचहित करणे या उद्देश्यने शालेय साहित्य भेट देऊन आपले वाढदिवस साजरे करण्याचे आवहन जगताप यांनी यावेळी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आन्नाभाऊ साठे, महात्मा फुले यांच्याविषयी बुद्धिमत्तेनुसार जगताप यांनी विचार मांडले. यावेळी सनी साळवे यांनी सुतरसंचालन केले. कार्यक्रमास पत्रकार अशोक भूसारी, मोहन शेगर,माजी उपसरपंच दादासाहेब वैराग़र, सदस्य सचिन वैराग़र,सागर वैराग़र,अवि वैराग़र, गणेश काकड़े, लखन वैराग़र, आकाश काकड़े, प्रकाश काकड़े, गणेश वैराग़र, सोना काकड़े, विकास साळवे, आदित्य सालवे, केतन जगताप, किरण गायकवाड़, विशाल जगताप अनिकेत गायकवाड़ अभी भालेराव, अक्षय पंडित, रितेश वैराग़र, दादा शिंदे आदि उपस्थित होते.

# पत्रकारांच्या वतीने संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** येथील पत्रकार बांधवांच्या वतीने शहरात पहिल्यांदाच संत सेवालाल महाराज यांची 285 वी जयंती हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळा येथे आयोजित कार्यक्रमात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. बंजारा समाजाचे आराध्य दैवत, धर्मगुरू, थोर समाज सुधारक संत शिरोमणी सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पत्रकारांच्या वतीने जिंतूर शहरात पहिल्यांदाच जयंती साजरी करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर, गुलाबराव शिंदे, मंचकराव देशमुख, बालाजी शिंदे, लक्ष्मीकांत उर्फ मुन्ना टाले, महेश देशमुख, ज्ञानेश्वर उर्फ माऊली रोकडे, शेख अलीम भाई, भागवत चव्हाण, रामप्रसादजी कंठाळे, राजाभाऊ काळे, राम रेघाटे, रहीम शेख, रफिक तांबोळी, संदीप माहूरकर,बि.डी.रामपूरकर, खुशालराव घुगे, संजय आडे, अहमद शेख यांची उपस्थिती होती.

# फलटण येथे आजपासून पर्यावरणस्नेही युवा स्पंदन साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**तरडगाव :** साहित्यप्रेमी सेवाभावी फाऊंडेशन फलटण यांच्या वतीने शुक्रवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी एक दिवसीय राज्यस्तरीय पर्यावरणस्नेही युवा स्पंदन साहित्य संमेलन २०२४ चे आयोजन फलटण येथील नवलबाई मंगल कार्यालयात करण्यात आलेले आहे.साहित्य व संस्कृती वाढीस लागून पर्यावरण संवर्धन व संरक्षण जागृती निर्माण करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे.
म्हणून या संमेलन घेण्यात आलेले आहे.ज्येष्ठ





विचारवंत व व्याख्याते प्राचार्य रविंद्र येवले यांची संमेलन अध्यक्षपदी तर कृषीतज्ञ सुगम शहा यांची स्वागताध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे, अशी माहिती माणदेशी साहित्यिक व संयोजक ताराचंद्र आवळे यांनी दिली.
या आगळ्यावेगळ्या राज्यस्तरीय पर्यावरणस्नेही युवा स्पंदन साहित्य संमेलनाचे उद्घाटन सातारा वनविभागचे उपवनसंरक्षक अदिती भारद्वाज व सातारा सामाजिक वनीकरणचे विभागीय वनअधिकारी हरिश्चंद्र वाघमोडे यांचे हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून फलटणचे वन परिक्षेत्र अधिकारी सचिन रघतवान, सामाजिक वनीकरणचे वनपरिक्षेत्र अधिकारी दिगंबर जाधव, ज्येष्ठ पत्रकार अरविंद मेहता, ज्येष्ठ कवी प्रदीप कांबळे यांची उपस्थिती राहणार आहे. दुसऱ्या सत्रात परिसंवादाचे आयोजन केले असून मानव व वन्यजीव संघर्ष याविषयी ग्लोबल अर्थ फाऊंडेशनचे सचिन जाधव व मंगेश कर्वे यांचे मानव व पर्यावरण सहसंबंध याविषयी नियत वनक्षेत्र अधिकारी राहुल निकम यांचे तसेच

साहित्यप्रेमी सेवाभावी फाऊंडेशन, फलटण
''उपजत गुणांचा विकास, हाच आमचा ध्यास''

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे याविषयी प्रा.पूनम मोरे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.तिसऱ्या सत्रात साताऱ्याचे ज्येष्ठ साहित्यिक आनंदा ननावरे यांच्या अध्यक्षतेखाली खुले कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार रमेश आढाव, ज्येष्ठ साहित्यिक महादेवराव गुंजवटे उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य ज्येष्ठ पत्रकार रविंद्र बेडकीहाळ व प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक सुरेश शिंदे यांच्या हस्ते राज्यस्तरीय माणगंगा साहित्य गौरव पुरस्कार वितरण व समारोप कार्यक्रम होणार आहे.तरी जास्तीत जास्त साहित्यिक, साहित्य रसिक,साहित्य प्रेमी व ग्रामस्थांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजक व माणदेशी साहित्यिक ताराचंद्र आवळे यांनी संयोजन समितीच्या वतीने केले आहे.

# भेंडा बुद्रुक येथे गणेश जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** नेवासा तालुक्यातील भेंडा बुद्रुक (लांडेवाडी) येथील गणेश मंदिरामध्ये गणेश जयंती भक्तिमय वातावरणात पुष्पवृष्टी व महाप्रसादाचे वाटप करून साजरी करण्यात आली. गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व महंत सुनीलगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व हभप कुंडलिक महाराज गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली भक्त गणांच्या सहकार्यातून झालेल्या गणेश जयंती सोहळयाच्या निमित्ताने सकाळी ७ ते ८ या वेळेत वेदमंत्राच्या जयघोषात गणेश मूर्तीस अभिषेक घालण्यात आला. त्यानंतर सकाळी ९ ते ११ यावेळेत हभप कृष्णा महाराज हारदे यांचे गणेश जन्मावर हरि कीर्तन झाले सदर कीर्तन त्यांनी गणेश जन्म व गणेश महिमा याबद्दल आपल्या सुश्राव्य वाणीतून उपस्थित गणेश भक्तांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी झालेल्या कीर्तन प्रसंगी श्रीराम साधना आश्रमाचे महंत श्री सुनीलगिरीजी महाराज व खडेश्वरी देवस्थानचे महंत गणेशानंदगिरीजी महाराज यांनी भेट दिली यावेळी त्यांचे व हभप कृष्णा महाराज हारदे यांचे गणेश भक्त संजय फुलारी यांच्या हस्ते संतपूजन करण्यात आले तर किर्तनानंतर सेवेकरी नामदेव निकम व सुभाष म्हस्के यांच्या वतीने उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, मारुतराव घुले पाटील पतसंस्थेचे चेअरमन बबनराव धस,सोहळा कमिटीचे सेवेकरी व ज्ञानेश्वरचे सुरक्षा अधिकारी सुनील देशमुख,कुंडलिक जाधव,रामेश्वर वायकर,बाळासाहेब खाटीक,दादासाहेब वाघ,किशोर मिसाळ, गुंजाळ भाऊ यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.गणेश जयंती निमित्ताने कीर्तनासाठी व गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती हा गर्दीचा ओघ रात्रीपर्यंत सुरूच होता.

# नेवासानगरीचे ग्रामदैवत श्री मोहिनीराजांच्या पंधरा दिवशीय यात्रोत्सव आजपासून सुरू

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** त्रिभुवनैक पवित्र! अनादि पंचक्रोशक्षेत्र! जेथ जगाचे जीवनसुत्र!श्री महालया असे!! श्री संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी ग्रंथात वर्णन केलेल्या स्थान माहात्म्य असलेल्या नेवासा पंचक्रोशीचे ग्रामदैवत श्री मोहिनीराज भगवंताचा यात्रा उत्सव व त्यानिमित्त श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ व किर्तन मिती माघ शुद्ध ७, शके १९४५ शुक्रवार दि. १६ फेब्रुवारी पासुन सुरुवात होत आहे. हा सर्व उत्सव पंधरा दिवस चालणार असून दि.२९ फेब्रुवारी रोजी यात्रेचा मुख्य दिवस आहे शुक्रवार दि. १६ फेब्रुवारी रात्री ९ वाजता गोकर्ण आख्यान , दि. १७ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारीपर्यंत नंदादीप ,समई , संहिता !! श्रीमद् भागवत सप्ताह !! १७ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारीपर्यंत भागावताचार्य श्री राघवेंद्रबुवा रामदासी (सज्जनगड) कथा निरुपण दुपारी २ ते ६ शनिवार दि.२४ रोजी श्रीमद भगवद्गीता व विष्णुसहस्त्रनाम सामुहिक पठन सकाळी ८ ते १० व रात्री ९ वाजता भळंद, रविवार दि. २५ रोजी पहाटे मा. तहसीलदार यांचे शुभहस्ते विधीवत मानाची पुजा, श्री मोहिनीराज उत्सव मुर्तीचे सवाद्य मंगल कार्यालयाकडे प्रस्थान दुपारी १ वाजता, रविवार दि २५ फेब्रुवारी ते बुधवार दि. २८ फेब्रुवारीपर्यंत दररोज सायंकाळी ६ वाजता महाप्रसाद पंगत असे कार्यक्रम होतील. रविवार दि. २५ ते बुधवार २८ फेब्रुवारीपर्यंत दररोज रात्री कीर्तनकार सौ गायत्रीताई जामदार यांचे सुश्राव्य किर्तन ,गुरुवार दि. २९ फेब्रुवारी यात्रेच्या मुख्य दिवशी पहाटे वडार समाजाच्या वतीने प्रवरासंगम वरुन आणलेल्या कावडीने जलाभिषेक, महाप्रसाद दुपारी १२ ते ३, सायंकाळी ६ वाजता श्रीं चे पालखीचे कार्यालयाकडून आगमन व काला, शुक्रवार दि. १ मार्च रोजी कुस्त्यांचा हंगामा जि. प .मराठी मुलांची शाळा दुपारी ४ वाजता, शनिवार दि. २ मार्च रोजी बैलगाडा शर्यत असा श्री मोहिनीराज यात्रा उत्सव असुन तरी सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री मोहिनीराज संस्थान अध्यक्ष व विश्वस्त मंडळ व उत्सव समीतीने केले आहे.

# निष्ठा काय असते हे आ. शंकरराव गडाखांनी दाखवले

## उद्धव ठाकरे : सोनई येथील संवाद मेळाव्यास दहा हजार कार्यकर्त्यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** निष्ठा काय असते हे आमदार शंकरराव गडाखांनी पक्ष संकटात असताना दाखवले असे गौरवोदगार शिवसेना ठाकरे गट प्रमुख उद्धव ठाकरे यांनी नेवासा तालुक्यातील सोनई येथे आयोजित संवाद मेळाव्यात बोलतांना काढले सुमारे दहा हजार कार्यकर्त्यांची उपस्थिती या संवाद मेळाव्याला होती.

सोनई येथील जगदंबा देवी मंदिर प्रांगणात माजी मंत्री आमदार शंकरराव गडाख यांच्या पुढाकारातुन मंगळवार दि १३ फेब्रुवारी रोजी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दहा हजार कार्यकर्ते शिवसैनिक यांच्या उपस्थितीत हा मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.




यापसंगी बोलतांना आमदार की शंकरराव गडाख म्हणाले की सोनईचे ग्रामदैवत असलेले जगदंबा देवी मंदिराच्या प्रांगणात उद्धव ठाकरे यांची उपस्थितीत सभा होते आहे. वर्षात दुसऱ्यांदा उद्धव ठाकरे सोनईला आले आहेत. सोनईची जगदंबा माता तुम्हाला लढण्यास बळ देणार आहे. मुख्यमंत्री पदाच्या काळात कुठलीही निवडणूक नसताना देखील शेतकरी बांधवांसाठी उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांना दिलेली कर्जमाफी ही राज्यातील शेतकरी बांधव कधीही विसरू शकत नाही. कोरोना काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कुटुंब प्रमुखाप्रमाणे राज्यातील नागरिकांची उद्धव ठाकरे यांनी घेतलेली काळजी यामुळे अनेकांना जीवदान लाभले. शिर्डी लोकसभा मतदार संघात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे जो उमेदवार देतील त्याला नेवासा तालुक्यासह सर्वच मतदार संघातून लीड मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे आ गडाख म्हणाले. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले सर्वाधिक गर्दी असलेली उद्धव ठाकरे यांची सभा सोनईत होत आहे ही बाब विशेष कौतुकाची आहे. ज्यांना अनेक पदे दिली असे लोक सोडून गेले तरी जनता ठाकरे बरोबरच राहणार आहे. यापसंगी बोलतांना खा संजय राऊत म्हणाले उद्धव ठाकरे यांना आ शंकरराव गडाख यांनी साथ दिलेली आहे हे योगदान आम्हीही कधीही विसरणार नाही. आ गडाख यांनी लहान भाऊ लक्ष्मणाप्रमाणे ठाकरे यांना साथ दिली आहे.सभेला उपस्थित असलेली गर्दी हे गडाख यांच्या संघटन कौशल्याचे यश आहे.आ गडाख हे मोठी क्षमता असलेले नेतृत्व आहे असे राऊत म्हणाले. यापसंगी बोलतांना उद्धव ठाकरे म्हणाले की, सध्या माझ्याकडे काहीही तुम्हाला काहीही देण्यास नसतांना देखील हजारो बांधव माझ्या सभेला उपस्थित आहेत,आपली उपस्थिती मला जिद्दीने लढण्यास बळ देणारी आहे.आ शंकरराव गडाख यांच्या रूपाने तुमच्या सारखी मनस्वी प्रेम करणारी माणसे मला भेटली आहेत. सत्ता येते व जाते पण माणसाचे प्रेम महत्वाचे आहे. सरकारमध्ये शंकरराव गडाख यांना कॅबिनेट मंत्री म्हणून संधी दिली याचा मनाला अभिमान आहे.सत्ता बदल झाल्यावर मंत्री पदाची संधी असतानाही आ शंकरराव गडाख यांनी साथ सोडली नाही. राज्यात शेतकरी बांधवांच्या विविध समस्या असतांना सत्ताधारी इतर पक्ष फोडण्यास व्यस्त आहेत येणाऱ्या निवडणुकीत जनता दलबदलुना जागा दाखवणार आहे.छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी असलेला महाराष्ट्र कुठल्याही हुकूमशाहीला बळी पडणार नाही. सोन्या सारखी पिके आणून देखील पीक कवडी मोल भावाने विकावे लागत असल्याने शेतकरी बांधव देशोधडीला लावण्याचे काम सरकार करत आहे,याचे उत्तर जनता आगामी निवडणुकीत दिल्याशिवाय राहणार नाही.हक्कासाठी शेतकरी दिल्लीला जाऊन धडकला तरी सरकार ला त्यांच्याकडे पाहण्यास वेळ नाही. पोलिसांकरवी दिल्लीत न्याय मागण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यावर अश्रूधुराचा मारा केला जातोय हे लोकशाहीला घातक आहे.एक रुपयात पीक विमा देण्याचा नावाखाली शेतकऱ्यांची थट्टा चालवली आहे. पंतप्रधान हे निवडणुका आल्या कीगोड भाषणे करून जनतेची दिशाभूल करण्यात पटाईत आहेत हे जनतेच्या लक्षात आले आहे.सध्याच्या सरकारची अवस्था मला नाही अब्रू व मी कुणाला घाबरू अशी झाली आहे.कट्टर भाजप व आर एस च्या जुन्या कार्यकर्त्यांना देखील दुसऱ्या पक्षाला फोडणे मान्य नसल्याचे ते म्हणाले. आमचे हिंदुत्व हे जनतेच्या घरात चुली पेटवणारे आहे, शिर्डी मतदार संघात गद्दारी करून गेलेल्या खासदाराने निवडणुकीला उभे राहूनच दाखवावे असे आवाहन खा लोखंडे यांना भर सभेत उद्धव ठाकरे यांनी केले.निष्ठा काय असते हे आ शंकरराव गडाख यांनी संकट काळात दाखवून दिले आहे हे मी कधीही विसरणार नाही. सोनईच्या जगदंबा मातेचा आशीर्वाद व जनतेची साथ घेऊन संकटावर मात करणार असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. उपस्थितांचे स्वागत आ. शंकरराव गडाख व सुनीलराव गडाख यांनी केले. यापसंगी युवासेनेचे वरुण सरदेसाई, मिलिंद नार्वेकर, युवा नेते उदयन गडाख, डॉ. निवेदिता गडाख, शुभांगी पाटील, खा. भाऊसाहेब वाकचौरे, रावसाहेब खेवरे, प्रा. शशिकांत गाडे, भगवान फुलसौंदर, संभाजी कदम, विक्रम राठोड, राजेंद्र दळवी, संदेश कार्ले, मच्छिंद्र म्हस्के, हरीभाऊ शेळके, पंकज लांभाते यासह नेवासा तालुक्यातील गाव, गावातून आलेले विविध संस्थाचे पदाधिकारी, कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. सभा स्थळी जय भवानी, जय शिवाजी कोण आला रे कोण आला या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.



## एड्स जनजागृती काळाची गरज : वंसाडे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था व जिल्हा रुग्णालय नगर यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डी येथे लोककलेच्या माध्यमातून प्रबोधन हा हेतु समोर ठेवून लोकशिक्षण एचआयव्ही एड्स आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम नुकताच संपन्न झाल्याची माहिती स्नेहालयाचे श्रेत्रीय आधिकारी अशोक वंसाडे यांनी दिली.

वंसाडे यांनी सांगितले कि एडस निर्मुलनासाठी जन प्रबोधन व समाजात जनजागृती व चांगले संस्कार व धार्मिक चांगले आचरणात आणले तर मोठ्या प्रमाणावर यश मिळू शकते त्यासाठी समाजाचा पुढाकार काळाची गरज आहे असे सांगितले शिवशाहीर सुनील चिंचोलीकर व कलावंत यांनी कलापथकाद्वारे शिर्डी बसस्थानकावर एचआयव्ही एड्स जनजागृती गोंधळ कार्यक्रम सादर करण्यात केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा रुग्णालयाचे आधिकारी जिल्हा कार्यक्रम शिवाजी जाधव शिर्डी वाहतूक नियंत्रण नानासाहेब आहेर सचिन सोमवंशी साईनाथ हॉस्पिटलचे प्रकाश भिटे अल्ताफ शेख यांनी कार्यक्रमाचे पर्यवेक्षण केले व तसेच ह्या कार्यक्रमाचे चांगल्या पद्धतीने नियोजन करण्याकरिता शिर्डी येथील स्नेहालयाचे क्षेत्रीय अधिकारी श्री अशोक वसांडे गोदावरी निकाळजे यांचे सहकार्य लाभले.

## अभ्यास दौऱ्यामुळे ज्ञानात भर पडून शेतीमध्ये सुधारणा करणे शक्य : डॉ. सी.एस. पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**राहुरी :** अभ्यास दौर्यामध्ये सहभागी शेतकर्यांनी भेटीसाठी निवडलेल्या यशस्वी कृषि उद्योजकांबरोबर चर्चा करुन त्यांनी केलेल्या विविध प्रयोगांचे अनुकरण आपल्या शेतीमध्ये करावे जेणेकरुन आपलीही प्रगती होईल. या अभ्यास दौर्यामुळे आपल्या ज्ञानात भर पडून शेतीमध्ये सुधारणा करणे शक्य होणार असल्याचे प्रतिपादन संचालक विस्तार शिक्षण डॉ. सी.एस. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे शेतकरी प्रथम कार्यक्रमांतर्गत पारनेर तालुक्यातील तिखोल व निघोज येथील प्रगतशील शेतकर्यांच्या शेतावर अभ्यास दौरा कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व संचालक विस्तार शिक्षण डॉ. सी.एस. पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता. या अभ्यास दौर्याला शुभेच्छा देताना विद्यापीठाचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. सी.एस. पाटील बोलत होते. यापसंगी प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, सहसमन्वयक डॉ. सचिन सदाफळ, श्री. विजय शेडगे, राहुल कोर्हाळे, श्री. किरण मगर उपस्थित होते. अभ्यास दौर्याचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. पंडित खर्डे यांनी केले. या अभ्यास दौर्यामध्ये 8 महिला शेतकरी व 28 पुरुष शेतकरी सहभागी झाले होते. या अभ्यास दौर्यामध्ये तिखोल येथील ढोकेश्वर सेंद्रिय शेती गटाचे प्रवर्तक बाळासाहेब ठाणगे यांचा सेंद्रिय शेती प्रकल्प तसेच निघोज येथील डॉ. चैतन्य ढोरमल व श्रध्दा ढवण यांच्या श्रध्दा फार्म या 315 म्हशींच्या अत्याधुनिक गोठ्यास शेतकर्यांनी भेटी दिल्या. आभार विजय शेडगे यांनी मानले.




## तिसगाव येथील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची दुसऱ्या दिवशीही फरफट सुरू; मूलभूत सुविधा देण्यास प्रशासन असमर्थ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** राज्यभर गाजत असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील मौजे तिसगाव परिसरातील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील विषबाधा प्रकरण हे गाजत आहे. यात तब्बल 96 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना विषबाधा होऊन देखील प्रशासनाने कुठल्याही प्रकारची दखल घेतली नसल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून प्रशासन मूलभूत सुविधा देण्यास असमर्थ असल्याचे आरोप आम आदमी पक्षाचे प्रदेश युवा संघटन मंत्री सतीश देवेंद्र लोखंडे यांनी केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मौजे तिसगाव तालुका खुलताबाद येथील शासकीय आदिवासी आश्रम शाळेत अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मंगळवार दिनांक 13 रोजी सकाळी विद्यार्थ्यांना दूध आणि घुगऱ्या देण्यात येऊन विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याचा प्रकार समोर आला होता. विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ, जुलाब, पोटदुखी चक्कर येणे यासारखे लक्षणे दिसून आल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र वेरूळ आणि ग्रामीण रुग्णालय खुलताबाद येथे विद्यार्थ्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. याबाबत आम आदमी पक्षाचे प्रदेश युवा संघटन मंत्री सतीश लोखंडे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांवर त्वरित चांगले उपचार करण्याची मागणी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे केली होती. दि. 14 रोजी खुलताबाद तालुक्यातील तिसगाव येथील आश्रम शाळेत श्री लोखंडे , जिल्हाध्यक्ष सुभाष निकम, तालुकाध्यक्ष मनोहर ठोंबरे, युवा तालुकाध्यक्ष किशोर जाधव, हरिदास सराटे यांनी भेट दिली असता आणखी अनागोंदी कारभार समोर आला. यात स्टॉक रजिस्टर मेन्टेन नसणे, अस्वच्छता, शौचालय असच्छता, स्वयंपाक खोली अस्वच्छता, आदी गोष्टी चव्हाट्यावर आल्या आहेत. तरी दोषींवर कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणीही श्री. सतीश लोखंडे यांनी केली आहे.



> शासकीय आदिवासी आश्रम शाळा तिसगाव येथे विद्यार्थ्यांना पुरेशा सुविधा नाहीत .विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळण्याचा प्रकार प्रशासन करत आहे . कुठल्याही प्रकारचा स्टॉक मेंटेन केलेला नाही . अनेक बाबी वर अनियमित्ता आढळून आली आहे . दोषींवर त्वरित कार्यवाही करावी नसता आम आदमी पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल . **सुभाष निकम, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी छत्रपती संभाजीनगर )**

## भरधाव वाहन पुलावरून थेट खाली कोसळले

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** पंजाबचे व्यापारी नागपूर येथे जात असताना त्यांची भरधाव इनोव्हा कार वर्धा नदीच्या पुलावरून थेट खाली कोसळली. कळंबपासून १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या यवतमाळ-वर्धा जिल्ह्याच्या सीमेवरील वर्धा नदीजवळ झालेल्या या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला, तर एक जण जखमी गंभीर जखमी झाला. ही घटना बुधवारी संध्याकाळी घडली. सुशील शिवाजी जगताप (४०, रा. लुधियाना) व हेमंत ठोंबरे (४१, रा. लुधियाना, पंजाब) अशी मृतांची नावे आहेत. या अपघातात कुशल सिंग रेसपाल सिंग (५७) हा व्यक्ती गंभीर जखमी झाला. त्याला पुढील उपचारासाठी यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. हे तिघे मित्र असून, कपड्याचे व्यापारी आहेत. इनोव्हा कार (क्र. पीबी- २३ क्यू – ९४५६) ने ते जळगाववरून कामानिमित्त यवतमाळला आले होते. बुधवारी सायंकाळी यवतमाळवरून नागपूरला निघाले. वर्धा नदीवरील पुलाजवळ एका ट्रकला ओव्हरटेक करताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे भरधाव वेगातील कार पुलावरून थेट खाली नदीच्या कोरड्या पात्रात कोसळली.

# अवैध वाळू उपसा; तीन बोटी केल्या नष्ट

## भुतेकरांच्या आंदोलनानंतर महसूल विभागाची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** खडकपूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू उपसा करण्यासाठी वापरात येणाऱ्या तीन बोटी व इंजिन एनआरएफच्या सहकार्याने महसूल विभागाने नष्ट केल्या. प्रशासनाच्या या संयुक्त कारवाईने वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.इसरूळचे माजी सरपंच संतोष भुतेकर यांनी केलेल्या आंदोलनानंतर प्रशासनाने ही धडाकेबाज कारवाई केली.

खडकपूर्णा जलाशयातून अलीकडील काळात पाण्यातील बोटीद्वारे वाळूचा अवैध उपसा केल्या जात होता. रेती वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांमुळे ग्रामीण भागातील रस्ते खराब होत असल्याची तक्रार करीत संतोष भुतेकर यांनी मंत्रालयात आत्मदहनाचा इशारा दिला होता. दरम्यान पोलिसांनी त्यांना जेरबंद केल्यानंतर महसूल प्रशासनाने दिलेल्या आश्वासना नुसार जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने उपविभागीय अधिकारी समाधान गायकवाड, तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या मार्गदर्शनात, एनआरएफच्या पथकासह नायब तहसीलदार अस्मा मुजावर तसेच पथकातील सर्व अधिकारी,तलाठी व कोतवाल यांनी मेव्हणा राजा शिवारात ८ फेब्रुवारी रोजी एक फायबर बोट, प्रत्येकी १०० फूट सेक्शन पाईप जोडलेले, १२ फेब्रुवारी रोजी एक फायबर बोट जोडलेल्या इंजिनसह, तसेच १३ फेब्रुवारी रोजी एक फायबर बोट व इंजिन, सेक्शन पाईप



व इतर साहित्य जागीच नष्टकरण्यात आले. सदर कारवाईत एन डी आर एफ पथक, महसूल पथक यांनी सहभाग नोंदविला. अवैध वाळू वाहतुकीवर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या या संयुक्त कारवाई नंतर अवैध वाळू उपचार करणारे टिप्परधारक तसेच वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे. एनडीआरएफ व महसूल प्रशासनाची संयुक्त कारवाई यापुढेही सुरूच राहणार असून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तसेच नदीपात्रातील बोटीवर कारवाईI करण्यात येईल असा इशारा उपविभागीय अधिकारी समाधान गायकवाड यांनी दिला आहे. याचबरोबर तालुक्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीवर कारवाईसाठी विशेष पथक निर्माण करण्यात आल्याची माहिती एसडीओ गायकवाड यांनी दिली आहे.

# गोदा महाआरतीवरून संघर्ष पोहोचला शिगेला

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** गोदा महाआरतीवरून पुरोहित संघ आणि रामतीर्थ गोदावरी सेवा समिती यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचला आहे. पंचवटी ग्रामसभेत गोदा आरती समिती बेकायदेशीर ठरवत पुरोहित संघाच्या दोन सदस्यांनी राजीनामा दिला. दुसरीकडे, हे सदस्य वगळता रामतीर्थ गोदावरी सेवा समिती एकसंघ असल्याचा दावा केला जात आहे. या वादात आता अखिल भारतीय तीर्थ पुरोहित महासभाही उतरली आहे. हरिद्वार, वाराणसी, प्रयागराज आदी तीर्थांवर तीर्थ पुरोहित संस्थांकडून आरती केली जाते. गंगा गोदावरी पुरोहित संघ सदैव गोदावरीची आरती करत असून नवी समिती स्थापून पुरोहित संघाच्या कार्यात अडथळे आणणे योग्य नसल्याचे महासभेने शासन, प्रशासनाला पाठवलेल्या पत्रात सूचित केले आहे. वाराणसी, हरिद्वारच्या धर्तीवर, गोदा आरतीला भव्य स्वरुप देण्यासाठी राज्य सरकारने कोट्यवधींचा निधी देण्याची तयारी दर्शविली आहे. या आरतीच्या नेतृत्वावरून रामतीर्थ गोदावरी समिती आणि पुरोहित संघात बेबनाव झाला आहे. या घटनाक्रमात ग्रामसभेत रामतीर्थ गोदावरी सेवा समिती बेकायदेशीर असल्याचा ठपका ठेवण्यात आला. ही समिति रद्द करावी आणि गोदा महाआरतीचा अधिकार पुरोहित संघाकडे ठेवण्याचा ठराव करण्यात आला. त्यानंतर सेवा समितीचे सदस्य प्रतिक शुक्ल, चंद्रशेखर पंचाक्षरी यांनी राजीनामे दिले. रामतीर्थ सेवा समिती ही शासकीय समिती असल्याचा संभ्रम पसरवला गेला. शासनाने ती स्थापन केलेली नाही, असा दावा पुरोहित संघाचे अध्यक्ष सतीश शुक्ल यांनी केला. राजीनामा देतानाही सदस्यांनी गोदा आरतीचा विषय ज्या प्रकारे हाताळला जात आहे.

# ११६ रस्त्यांचे नूतनीकरण कामासाठी ३६८ कोटी ३५ लाखांचा निधी मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल त्रिभुवन**

**वैजापूर :** तालुक्यात खडबडीत रस्त्याचे आरोग्य स्थिती दुरुस्त करण्यात लोकप्रतिनिधीचा शासन दरबारी पाठपुराव्याला अभूतपूर्व यश मिळाले आहे. साडेचार वर्षांत केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेतून ११६ रस्त्यांचे नूतनीकरण कामासाठी ३६८ कोटी ३५ लाखाचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून आता पर्यत २१ कामे पुर्ण झाली असून ६८ कामे होण्याच्या अंतिम मार्गावर आहेत.

बांधकाम विभागाकडून २९ कामाची निविदा प्रक्रिया सुरु असल्याची महिती सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे सहाय्यक कार्यकारी अभियंता अजित रोडगे यांनी दिली.तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नागपूर ते मुंबई समृद्धी विशेष महामार्गाचे स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले. मात्र हा वाहतूक निर्माण करण्यासाठी तालुक्यातील २०० किलोमीटर वाहतूक मार्गाचा चुराडा झाला होता. विविध भागातून रस्ते निर्मितीसाठी क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात बांधकाम साहित्याची वाहनाद्वारे वाहतूक केल्यामुळे स्थानिक पातळीवरील रस्त्याची चाळणी झाली होती.वैजापूर तालुक्यात समृध्दी महामार्गाचे ५५ किलोमीटर रस्त्यासाठी २०० किलोमीटर रस्त्याची वाट लागली होती.रस्ते वाहतूकीचे उद्ध्वस्त झालेले जाळे पुन्हा नव्याने उभे करण्याचे अवघड आव्हान आ.रमेश बोरनारे यांनी स्वीकारुन केंद्र व राज्यसरकार कडील विविध योजनेतून ११६ रस्त्यांना ३६८ कोटीचा निधी मंजूर करुन आणण्याची कामगिरी केली. त्यांच्या या भुमिकेमुळे ग्रामीण भागातील प्रत्येक गाव डांबरी रस्त्याला जोडले गेले आहे.

**गोदावरी नदीवरील पुलामुळे दोन विभागाचा संपर्क जुळला ....**
गोदावरी नदीपात्रातील नागमठाण ते श्रीरामपूर या मार्गावरील पुलाचे अनेक वर्षापासून रखडलेले कामाला गती देण्यासाठी आ .रमेश बोरनारे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केल्यामुळे मराठवाडा – पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा महत्वाचा संपर्क मार्गाचे काम अंतिम टप्प्यात पोहचले असून वर्षभरात दोन्ही विभागाचा वाहतुक संपर्काची नाळ जुळून येणार आहे .तसेच शिवसेना – भाजपा पदाधिका–यांच्या एकत्रित पाठपुराव्यामुळे पुरणगाव – पुणतांबा या मार्गातील पुलाच्या कामासाठी २० कोटीचा निधी मंजूर झाला .

# उकळते पाणी अंगावर पडून चिमुकल्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आंघोळीसाठी केलेले गरम पाण्याचे पातेले दीड



वर्षीय चिमुकल्याच्या अंगावर पडले. त्यात चिमुकला गंभीररित्या भाजला. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. मात्र, उपचारादरम्यान चिमुकल्याचा मृत्यू झाला. रेहान आशिष धारगावे असे मृत मुलाचे नाव आहे. अजनी हद्दीतील प्लॉट नंबर ११, रमानगर, शताब्दी चौक येथे धारगावे कुटुंबिय राहतात. आशिष धारगावे यांचा एकुलता एक दीड वर्षाचा रेहान घरात नेहमीप्रमाणे खेळत होता. त्याची आई घरकाम करत होती. दरम्यान त्याची आई गरम पाण्याचे पातेले घेऊन जात असताना अचानक तिच्या हातातील पातेले पडले. त्यातील गरम पाणी रेहानच्या अंगावर पडले. यात तो गंभीररित्या भाजला. तडफडत असलेल्या रेहानला तातडीने उपचाराकरिता खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. २३ दिवस रेहानची जीवन-मृत्यूशी झुंज सुरू होती. परंतु, १२ फेब्रुवारी रोजी तो ही झुंज हरला. या प्रकरणी रेहानचे काका अतूल धारगावे यांनी दिलेल्या सूचनेवरून अजनी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.



# आंदोलक शेतकऱ्यांना घेतले ताब्यात

## भाजपाच्या दुटप्पी धोरणाचा शेतकऱ्यांनी केला निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**देसाईगंज :** तालुक्यात शंकरपुर फिडर अंतगत येत असलेल्या शेतकऱ्यांसह इतरही भागातील शेतकऱ्यांना १२ तास विज मिळत असतांना त्यात कपात करून ८ तास खंडित वीज पुरवठा करणे सुरु करताच रब्बी हंगाम प्रभावित होण्याची दाट शक्यता लक्षात घेता तालुक्यातील शेतकऱ्यांनी काँग्रेस कार्यकर्ते रामदास मसराम व पिंकु बावणे यांच्या नेतृत्वात २४ तास विज पुरवठ्यासाठी आपल्या रास्त मागणीला घेऊन वीज वितरण कंपनीच्या देसाईगंज येथील उपविभागीय कार्यालयासमोर चक्काजाम आंदोलन करून मागणी मान्य होईस्तोवर आंदोलन मागे घेण्यास नकार दिल्याने कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता देसाईगंज पोलिसांनी आंदोलक शेतकऱ्यांना ताब्यात घेतले.

दरम्यान शेतकऱ्यांच्या जगण्या मरण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असताना यावर यथाशिघ्र तोडगा काढण्याऐवजी शेतकऱ्यांची दिशाभूल करून दडपशाहीचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येत असल्याने आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांनी देसाईगंज पोलीस ठाण्यासमोर सत्ताधारी भाजपाच्या दुटप्पी धोरणाचा जाहिर निषेध करत शेतकऱ्यांच्या जमावड्याने गडचिरोली जिल्हा असंघटित कामगार कर्मचारी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष छगन शेडमाके यांच्या नेतृत्वात जोरदार निदर्शने केली.

सकाळी ताब्यात घेतलेल्या शेतकऱ्यांशी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी संवाद साधून यावर पर्यायी तोडगा काढण्यासाठी शिष्टमंडळास जिल्हाधिकारी गडचिरोली यांना मागणीचे निवेदन सादर करून चर्चा घडवून आणली. दरम्यान शेतकऱ्यांनी देसाईगंज तालुक्यात सद्यास्थितीत रब्बी हंगाम जोमात असुन या अंतगत धान, मका तसेच भाजीपाला वर्गीय पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली आहे.१२ तास वीज मिळत असल्याने कृषीपंप धारकांनी मोठ्या प्रमाणात रब्बी हंगाम पिक लागवड केली. मात्र लोडशेडिंग सुरु करून ८ तासच वीज पुरवठा करण्यात येऊ लागताच जमिनीतील पाणी जमिनीतच मुरु लागल्याने उभे पिक जगवायचे कसे,अशी आपबीती कथन केली.

यावर यथाशिघ्र तोडगा काढण्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रतिनीधी अतिरीक्त जिल्हाधिकारी धनाजी पाटील यांनी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळास आश्वासन दिले. निवेदन देताना रामदास मसराम, पिंकु बावणे, जावेद शेख, विलास बन्सोड, श्याम मस्के,सागर वाढई,शुभम नागपूरकर, सुरेंद्र दोनाडकर, राजु गायकवाड, हिराजी बुल्ले, शिवाजी ठाकरे, पितांबर मस्के आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# शिक्षणक्षेत्रातील नवीन विचार प्रवाह शिक्षकांसह विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे : प्राचार्य डॉ. झोपे

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा यानुसार अपेक्षित क्षमता, कौशल्ये व ज्ञान शिक्षकांमध्ये विकसित होवून त्या माध्यमातून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणक्षेत्रातील नवीन विचार प्रवाह शिक्षकांसह विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, असे आवाहन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे यांनी केले.

जळगाव येथील जी.एच. रायसोनी महाविद्यालयात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी क्षमता वृद्धी जिल्हास्तरीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी रायसोनी कॉलेजच्या प्राचार्य डॉ. प्रीती अग्रवाल, प्रशिक्षण समन्वयक अधिव्याख्याता डॉ. चंद्रकांत साळुंखे, वरिष्ठ अधिव्याख्याता प्रतिभा भावसार, अधिव्याख्याता डॉ. जगन्नाथ दरंदले, प्रशिक्षण साहित्य निर्मिती राज्य सुलभक डॉ. जगदीश पाटील यांच्यासह इतरांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविकात डॉ. चंद्रकांत साळुंखे म्हणाले की, क्षमता वृद्धी प्रशिक्षण विषयनिहाय नसून एकात्मिक स्वरूपाचे आहे. बारा विषयाच्या माध्यमातून शिक्षक व विद्यार्थ्यांपर्यंत नवीन दृष्टिकोन व साधनांची माहिती पोहोचवण्यासाठी हे प्रशिक्षण




आहे, असे सांगून त्यांनी तीनदिवसीय प्रशिक्षण आयोजनाचा हेतू सांगितला. डॉ. प्रीती अग्रवाल यांनी शिक्षणक्षेत्रात सध्या असलेली विविध आव्हाने व भविष्याला सामोरे जाताना घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगतात डायट प्राचार्य डॉ. अनिल झोपे यांनी क्षमता वृद्धी प्रशिक्षणाची उद्दिष्टे सांगून विद्यार्थी केंद्रित शिक्षणासाठी शिक्षकांनी स्वतःला अद्ययावत करण्याची गरज असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन छाया पवार यांनी तर आभार अधिव्याख्याता डॉ. जगन्नाथ दरंदले यांनी मानले.

जिल्ह्यातून 235 प्रशिक्षणार्थी - जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून 235 प्रशिक्षणार्थी शिक्षक प्रशिक्षणात सहभागी झाले असून ते यानंतर तालुकास्तरावर सुलभक म्हणून कार्य करणार आहेत. त्यांना डायटचे वरिष्ठ अधिव्याख्याता प्रतिभा भावसार, अधिव्याख्याता डॉ. चंद्रकांत साळुंखे, अधिव्याख्याता डॉ. जगन्नाथ दरंदले, अध्यापक विद्यालयाचे प्रा. पद्मसिंग परदेशी, प्रा. जागृती भोळे, विषय साधन व्यक्ती प्रशांत सोनवणे, माध्यमिक शिक्षक डॉ. नरेंद्र महाले, केंद्रप्रमुख शुभांगी पाटील, छाया पवार, उच्च माध्यमिक शिक्षक जे.पी. बडगुजर, डॉ. अतुल इंगळे, डॉ. जयंत इंगळे मार्गदर्शन करत आहेत.



## पुस्तक हे मस्तक घडविते; अय्युब पठाण लोहगावकर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शाहू विद्यालय जायकवाडी येथे नुकतेच मार्च २०२४ च्या १०वीची बोर्डाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थी यांना विद्यालयाच्या वतीने निरोप देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक शंकरराव वाघमोडे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ शिक्षक तथा प्रसिध्द ग्रामीण साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर हे होते. श्री. पठाण यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, " नियमीत अभ्यास केल्याने घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत हमखास यश मिळते. प्रत्येक विद्यार्थी यांचे पुस्तक वाचन हे चांगले मस्तक घडविते. व्यक्तीमत्वात आणि वर्तनात सकारात्मक परीवर्तन घडते. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यानी जीवनात येणाऱ्या प्रत्येक संकटाला धैर्याने तोंड दिले पाहीजे." याप्रसंगी कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका- शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नारायण राणे यांच्या बेताल वक्तव्याच्या निषेधार्थ जिंतुरात पुतळा जाळून निषेध

## सकल मराठा समाज राणे विरोधात आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** केंद्रीय राज्य मंत्री नारायण राणे यांनी मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर बेताल वक्तव्य केल्यामुळे शहरातील सकल मराठा समाजाने आक्रमक भुमिका घेऊन नारायण राणे यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास जोडे मारून जाळून टाकल्याचे आंदोलन दिनांक 14 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 5 वाजेच्या सुमारास आंदोलन करण्यात आले.
मराठा समाजाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील आरक्षणाच्या मागणीसाठी चार दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले आहेत यावेळी त्यांची तब्यत खालावत आहे यामुळे मराठा समाजाने आक्रमक भूमिका घेतली असून महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली मात्र एकीकडे मनोज जरांगे पाटील आपला जिव धोक्यात घालत आहेत तर दुसरीकडे केंद्रीय राज्यमंत्री नारायण राणे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या बाबत बेताल वक्तव्य करून मराठा समाजाच्या भावना दुकावण्याचे काम केले आहे त्यामुळे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल मराठा समाजातील युवकांनी एकत्र येत नारायण राणे यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास जोडे मारून पुतळा जाळून निषेध नोंदवला आहे या आंदोलनात मोठ्या प्रमाणात सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## लोणंद येथे निरा देवघर या योजनेवर बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** निरा देवघर ही योजना जिव्हाळ्याचा प्रश्न असून या प्रश्नी युवक सुद्धा संवाद साधू लागले आहेत.ही योजना जाणून घेण्यासाठी लोणंद, ता.खंडाळा येथील त्रिकालदर्शी आर्किटेक्ट ऑफिस येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या योजनेमध्ये वाघोशी, कराडवाडी, मरीआईची वाडी, बावकलवाडी, धायगुडे मळा, पिंपरे बुद्रुक या गावांना या योजनेचा कसा फायदा होईल यावर सविस्तर चर्चेत करण्यात आली. गणेश केसकर यांनी सर्वांशी संवाद साधत असताना सर्वांनी चर्चा केली. शाखा नलिकेमधून पोटफाटे कोणकोणत्या ठिकाणी असायला हवेत यावर चर्चा झाली. तसेच जिथे जिथे एक्झिस्टिंग तलाव आहेत त्या तलावांमध्ये पाणी सोडण्याबाबत चर्चा झाली. या चर्चेला इरिगेशन डिपार्टमेंटचे असिस्टंट इंजिनियर उपस्थित होते. तसेच धुळा कराडे, विराज कुंडलकर, सुरेश कुंडलकर ठोंबरे साहेब धायगुडे साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.पंचक्रोशीतील नागरिकांना काही या योजनेअंतर्गत शंका असतील तर त्यांनी संपर्क साधावा असे आर्किटेक्ट गणेश विमल दादा केसकर यांनी म्हटले आहे.

## कुसुम-बी योजनेत सौर कृषिपंपासाठी संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन : महावितरण

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** एप्रिल-2018 नंतर कृषिपंपाच्या वीजजोडणीसाठी कोटेशन भरलेल्या ग्राहकांना पारंपरिक जोडणीऐवजी कुसुम-बी योजनेत सौर कृषिपंप घेण्याचा पर्याय महावितरणने दिला आहे. या योजनेत लाभार्थ्याने फक्त ऑनलाईन पैसे भरणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारची अतिरिक्त रक्कम देऊ नये, असे आवाहन महावितरणने केले आहे.
1 एप्रिल 2018 नंतर कृषिपंपाच्या वीजजोडणीसाठी कोटेशन भरलेल्या ग्राहकांना कृषी वीज धोरण-2020 नुसार विद्युत जोडण्या देण्यात येतात. मात्र शासन व महावितरणने कुसुम-बी या योजनेंतर्गत पैसे भरून वीजजोडणी प्रलंबित असणाऱ्या ग्राहकांना सौर कृषिपंप घेण्याचे आवाहन केले. त्यास जिल्ह्यात चांगला प्रतिसादही मिळत आहे. त्यासाठी लाभार्थ्याने फक्त ऑनलाईन पैसे भरणे अपेक्षित आहे. यात संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन असून, कोणत्याही माणसाशी संपर्क साधण्याची गरज नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकारची अतिरिक्त रक्कम (जसे सौर कृषी पंप वाहतूक व इतर खर्च) देऊ नये. असे आवाहन महावितरणने केले आहे. याविषयी काहीही अडचणी असतील तर शक्यतो दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत लाभार्थ्याने स्वतः सविस्तर माहितीसाठी ग्रामीण मंडल कार्यालयास भेट द्यावी अथवा 7875431555 या मोबाईल क्रमांकावर तर जालना जिल्ह्यातील लाभार्थ्यांनी 7875680617 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.



## कुष्ठरोग आजाराबाबत जनजागृती मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आरोग्य उपकेंद्र जटवाडा येथे डॉक्टर नावेद शेख समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्श अभियानांतर्गत कुष्ठरोग आजाराबद्दल संपूर्ण माहिती देण्यात आली यावेळी श्री घुगे कुष्ठरोग तंत्रज्ञ, आरोग्य सेविका श्रीमती मेश्राम, आरोग्य सेवक राजु तायडे हजर होते.
सध्या जिल्ह्यात 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारी 2024 स्पर्श कुष्ठरोग जनजागृती पंधरवाडा सुरू आहे त्याच लोकांना खालील आरोग्य शिक्षण देण्यात आले न दुखणारा न खाजणारा बधिरचट्टा असल्यास तुमच्या गावातील आशाताई यांची भेट घेऊन सरकारी दवाखान्यात जाऊन तपासणी करून घ्यावी, या मोहिमे अंतर्गत महिला मंडळ सभा बचत गट सभा उपकेंद्रांतर्गत प्रत्येक शाळेत कुष्ठरोग प्रतिज्ञा घेण्यात आली सपना नाटिका गांधीजी पेहराव शाळेतील मुलांचे प्रभात फेरी गावात काढण्यात आली आहे.
अभियानासाठी उपकेंद्रात अंतर्गत सर्व गावांमध्ये डॉक्टर नविद शेख समुदाय आरोग्य अधिकारी यांनी परिश्रम घेतले आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# 18 ते 20 फेब्रुवारीदरम्यान 'शिवगर्जना' हे महानाट्य

## बैठक व्यवस्था, वाहनतळ, सजावट आणि सुरक्षेविषयी अधिकाऱ्यांकडून पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या 350 व्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई आणि जिल्हा प्रशासन, धाराशिव यांच्या संयुक्तवतीने 18 ते 20 फेब्रुवारी 2024 दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित " शिवगर्जना " या महानाट्याचे आयोजन श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुल, धाराशिव येथे सायंकाळी 6.30 वाजता करण्यात येणार आहे.या महानाट्यात 12 व्या शतकापासून ते शिवजन्मापर्यंत व शिवजन्मापासून ते शिवराज्याभिषेकापर्यंत पूर्ण इतिहास मांडण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी दिली.

'शिवगर्जना' महानाट्याची प्रेक्षक क्षमता 10 ते 15 हजार इतकी आहे.फिरता 65 फुटी भव्य रंगमंचावर 300 कलावंत हे महानाट्य सादर करणार आहे.यामध्ये हत्ती,घोडे,उंट व बैलगाडी देखील असणार आहे.या महानाट्यामध्ये चित्तथरारक लढाया,रोमांचकारी प्रसंग,एक धगधगत्या इतिहासाची आठवण,नेत्र सुखद अतीषबाजी,खराखुरा निखळ इतिहास, मंत्रमुग्ध संगीत,नेत्रदीपक प्रकाश योजना, आकर्षक वेशभूषा, लोककला व लोकनृत्याची यथायोग्य सांगड घातलेली पाहायला मिळणार आहे.

या महानाट्यमध्ये विनायक चौगुले छत्रपती शिवाजी महारजांची भुमिका साकारत आहे.बाल शिवाजी राजेंची भुमिका सूरज कोळी साकारत असून मां जिजाऊची भुमिका दिपाली हांडे,शहाजी राजेंची भुमिका सुहास चौगुले तर अफजल खानाची भुमिका शकील पटेल हे साकारणार आहेत.या महानाट्यात 250 हून अधिक कलावंत,हत्ती,घोडे,उंट व बैलगाडी यांचा प्रत्यक्ष वापर होणार आहे.

या महानाट्याचे निवेदक राम गुरव आणि शाहीर शुभम वाघे असतील.छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील महानाट्य ' शिवगर्जना 'चे विनामूल्य प्रयोग आयोजित करण्यात आले आहेत.हे प्रयोग प्रतिदिन सायंकाळी 6.30 वाजता सुरु होतील. प्रत्येक दिवशी किमान 10 हजार नागरिक उपस्थित राहतील,अशी व्यवस्था जिल्हा प्रशासनाकडून केली जात आहे.कार्यक्रम स्थळाची बैठक व्यवस्था,वाहनतळ,सजावट आणि सुरक्षेविषयी अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात येत आहे.अल्लाउद्दीन खिलजीचे आक्रमण,विजयनगरचे साम्राज्य,लखोजी राजाची हत्या, शिवजन्म,युद्ध कला व राज्यकारभार प्रशिक्षण,स्वराज्याची शपथ, अफजलखानाचा वध,पन्हाळगड वेढा,पावनखिंडीतील शौर्यगाथा, शाहिस्तेखानाची फजिती,सुरत मोहिम,कोकण मोहीम,पुरंदर वेढा, मुरारबाजीचे शौर्य,आग्रा भेट,तानाजी मालुसरेचे बलिदान आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा हे प्रसंग या महानाट्यातून बघायला मिळणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास महानाट्याच्या माध्यमातून सादर होणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिवप्रेमी नागरिकांनी या महानाट्याच्या लाभ घ्यावा. असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



# राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त तीन लाख लाभार्थ्यांना औषध देणार

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** महापालिकेच्यावतीने राष्ट्रीय जंतनाशक दिन शहरात दि. १३ फेबुवारी रोजी राबविण्यात आला. यनिमित्ताने महानगरात तीन लाख लाभार्थ्यांना जंतनाशक औषध दिले जाणार आहे. नाशिक महानगरपालिकेच्या अटल बिहारी स्कूल,काठे गल्ली,शाळा क्र.४३ मध्ये मोहिमेचे उदघाटन करण्यात आले.यावेळी अतिरिक्त आयुक्त सेवाश्रीमती स्मिता झगडे,सहा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अजिता साळुंखे,विभागीय नोडल वैद्यकीय अधिकारी नाशिक पूर्व डॉ.गणेश गरुड,संत गाडगे महाराज प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ पीरजादा आईजा आणि कर्मचारी व अटल बिहारी वाजपेयी शाळेच्या मुख्याध्यापिका छाया माळी आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांनी विद्यार्थ्यांना जंतनाशक दिनाचे महत्व पटवून दिले. तसेच ज्या विद्यार्थ्यांना जंतनाशक दिनाच्या दिवशी जंतनाशकाची गोळी राहून गेलेली असेल अशा विद्यार्थ्यासाठी मॉप अप दिन २० फेबुवारी रोजी राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंर्तगत १ ते १९ वयोगटातील लाभार्थांना अल्बेडेझॉलची गोळी (जंतनाशक) देण्यात आली.१ ते १९ वर्ष वयोगटातील किमान २८ टक्के बालकांमध्ये आढळणारा आतड्यांचा कृमीदोष हा मातीतून प्रसारित होणाऱ्या जंतापासून होतो. याचे प्रमुख कारण म्हणजे परिसर स्वच्छतेचा अभाव असणे हे आहे.बालकांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे या उद्देशातून जंतनाशक मोहीम राबविण्यात येते. बालकांमध्ये आढळून येणारा जंतदोष हा साधारण वाटत असला, तरी त्याचे वाईट परिणाम आरोग्यावर दिसून येतात. जंतदोषामुळे बालकांना ॲनिमियाचा सर्वाधिक धोका उद्‌भवतो. शिवाय आतड्यावर सूज येणे, भूक मंदावणे, उलट्या, अतिसार, पोटदुखी आदी आजार डोके वर काढतात. हा दोष टाळण्यासाठी बालकांना वर्षातून दोन वेळा जंतनाशक गोळी देणे गरजेचे आहे. याअनुषंगाने आरोग्य विभागामार्फत वर्षातून दोन वेळा विशेष मोहीम राबविली जाते. कृमीदोष हा रक्तक्षय आणि कुपोषणाचे कारण आहे. तसेच बालकांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटण्याचे कारण ठरते. ही बाब लक्षात घेऊन १ ते १९ वर्ष वयोगटातील सर्व शालेय विद्यार्थी यांना शाळा व अंगणवाडीकेंद्र स्तरावर गोळी देऊन त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्तिथी व जीवनाचा दर्जा उंचावणे हा राष्ट्रीय जंतनाशक दिनाचा हेतू आहे.

# जुनिअर कॉलेज येथे पालक मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील दरेगाव येथील महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व जुनिअर कॉलेज दरेगाव. येथे पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी प्रथम महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. स्वराज्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय गायकवाड सर व प्रमुख पाहुणे दरेगावचे सरपंच संदीप गायकवाड व उप सरपंच श्री अजिनाथ खंडागळे हे होते याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. वेताळ पी. आर. यांनी शाळेच्या प्रगतीचा अहवाल वाचन केला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्राचार्य गायकवाड सरांनी पर्यावरण, वृक्ष संवर्धन, गुणवत्ता यासंबंधी विचार मांडले पालकांच्या सूचनांचे निरासरण केले. पालक विद्यार्थी शिक्षक यांचे संबंध कसा असावा हे सुद्धा त्यांनी आपल्या विचार विचारातून व्यक्त केले याप्रसंगी सरपंच श्री. संदीप गायकवाड यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केल. या पालक मेळाव्याला श्री. विलास दादा गायकवाड, श्री .साहेबराव अण्णा गायकवाड, सोमीनाथ गायकवाड, अशोक गायकवाड, विष्णू गायकवाड, बाळू गायकवाड रामचंद्र सुरासे, सुभाष गायकवाड हरिदास काकडे, शिवाजी गायकवाड, मगरे, कैलास गायकवाड, विलास गायकवाड, शिवाजी गायकवाड नवनाथ गायकवाड, सागर मोटे, अजिनाथ गायकवाड, गोरख गायकवाड पालकांची उपस्थिती होती.

या प्रसंगी शाळेतील शिक्षक साळुंके, पाटील, पवार, निळ, भवरे, विष्णू गायकवाड, निंभोरे , ताकटे, बनसोडे, शिंदे, शिक्षकेत्तर कर्मचारी देवकर, दत्तू, काळे, जाधव, रंजना या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी पडुळे यांनी केले शेवटी आभार प्रदर्शन शांताराम कापडणे यांनी केले.





# येवल्यात वसंत पंचमी उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**येवला :** येथील देवांग कोष्टी समाजातर्फे वसंत पंचमी मोठया उत्सहात साजरी करण्यात आली. श्री.चौंडेश्वरी माता मूर्ती पुनःप्राणप्रतिष्ठा एकादश वर्धापन दिनानिमित्त बुधवार १४फेब्रुवारी २०२४ रोजी साजरी करण्यात आली. मधली गल्ली येथेल श्री.चौंडेश्वरी मंदिरा पासून सहवाद्य पालखी मिरवणूक शहराच्या मुख्य मार्गावरून काढण्यात आली.

तसेच पहाड गल्ली येथे टक्कर गणेश मित्र मंडळाच्या वतीने भक्तांना अल्पउपहाराचा कार्यक्रम करण्यात आला.

दरम्यान सर्व समाजाच्या नागरिकांनी पालखी सोहळ्याचे रांगोळी, फुलांनी स्वागत केले. श्री.चौंडेश्वरी मंदिरात वसंत पंचमी उत्सवा निमित्ताने वरोड़े बंधु यांच्या संगीतमय साथीने महाआरती करून श्री.चौंडेश्वरी मातेची पंचामृताने अभिषेक सोहळा विधीवत श्री व सौ रमेश भिकाजी काळंगे. श्री व सौ. श्याम वामन बोटकर श्री व सौ दिलीप बन्सीलाल काळे, सपत्नीक यांच्या हस्ते मातेची भक्तीमय वातावरणात पूजा करण्यात आली. प्रमुख पाहुणे कोष्टी कोष्ठा फेडरेशनचे चे संस्थाध्यक्ष अरुण वरोडे हे लाभले दरम्यान विविध कार्यक्रमात सकाळी श्री.चौडेश्वरी मातेची पंचामृता ने अभिषेक सोहळा, मातेला शाक - भाज्यांची सजावट, रक्तदान शिबीर,असे विविध कार्यक्रम झाले. मनोज भागवत, गणेश खळेकर, मनोज दिवटे अतुल घटे, संतोष भरते, आदीं विविध पदावर गेलेले मान्यवरांचे या वेळी सत्कार करण्यात आले व समुदायीक आरती महाप्रसाद असे विविध कार्यक्रम या वेळी संपन्न झाले. दरम्यान येवले तालुक्यातील नागडे तसेच बल्हेगाव येथेही वसंत पंचमी निमित्त माता श्री. चौंडेश्वरी मातेची मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजा करून उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी समस्त देवांग कोष्टी समाज विश्वस्त,कार्यकारणी, उत्सव समिती सह महिला मंडळ उपस्थित होते.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर